# महाराष्ट्र विधानसभा

## तिसरे अधिवेशन, २०१७

## अतारांकित प्रश्नोत्तरांची यादी

**प्रश्नांची एकूण संख्या - ५०**

**महानगर व नगरपालिका क्षेत्रातील शहरी गरिबांसाठी सुर्वण जयंती योजना लागू केल्याबाबत**

**(१) १२३३३ (०७-०४-२०१५). श्री.चंद्रकांत सोनावणे (चोपडा) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) शासनाने महानगर व नगरपालिका क्षेत्रातील शहरी गरिबांसाठी दिनांक १ डिसेंबर, १९९७ पासून शहरी सुवर्ण जयंती योजना लागू करुन व्यक्तीगत व्यवसायासाठी ५० हजार रुपये कर्ज व २५ टक्के सबसिडी देण्याच्या निर्णयात दिनांक १ एप्रिल, २००९ रोजीपासून २ लाख रुपये कर्ज व २५ टक्के सबसिडी अशी सुधारणा केली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, महिला बचत गटांना दिनांक १ डिसेंबर, १९९७ रोजीपासून २.५० लाख रुपये कर्ज व ५० टक्के सबसिडी यामध्येही दिनांक १ एप्रिल, २००९ पासून ५ लाख रुपये कर्ज व ३५ टक्के सबसिडी अशी सुधारणा केली आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, दिनांक १ डिसेंबर, १९९७ रोजीपासून महानगर व नगरपालिकांनी बँकांकडे लाखो प्रकरणे पाठविली असून मंजूर प्रकरणासाठी सबसिडी वर्ग करुनही बँकांनी व्यक्तीगत व सामुहिक (बचत गटांना) कर्ज पुरवठा केलेला नाही व शासनाची सबसिडी बँका वापरित आहेत, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, आतापर्यंत किती व्यक्तिगत व बचत गटातील लाभार्थ्यांना कर्ज वाटप करण्यात आले आहे व किती प्रकरणे प्रलंबित आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (२६-०६-२०१७)** :(१) हे खरे नाही. शहरी सुवर्ण जयंती योजनेअंतर्गत लाभार्थ्याला रु. ५०,०००/- पर्यंत किंमतीच्या प्रकल्पाला कर्ज देण्यात येते. यामध्ये १५ टक्के किंवा कमाल रुपये ७५००/- मर्यादेपर्यंत अनुदान अनुज्ञेय होते. लाभार्थ्याने स्वत:च्या हिस्सा म्हणून प्रकल्प किंमतीच्या ५% बीज भांडवल गुंतवावयाचे होते, असा अहवाल आयुक्त तथा संचालक, नगरपरिषद प्रशासन संचालनालय यांनी सादर केला आहे.

(२) हे खरे नाही. महिला बचत गटांना व्यवसाय करण्यासाठी विशेष प्रोत्साहन म्हणून रु.२,५०,०००/- पर्यंतचे कर्ज व प्रकल्प किंमतीच्या ५% एवढी रक्कम गटाचे बीज भांडवल होते.

(३) हे खरे नाही. दिनांक २८.०८.२०१४ च्या शासन निर्णयाने सुवर्ण जयंती शहरी रोजगार योजना बंद करण्यात आलेली आहे. त्यामुळे या योजनेअंतर्गत बँकेकडे कोणतीही प्रकरणे प्रलंबित नाहीत

(४) सुवर्ण जयंती शहरी रोजगार योजना बंद झाल्याने या योजनेअंतर्गत बँकेकडे कोणतीही प्रकरणे प्रलंबित नाहीत.

---

## कुलाबा (मुंबई) येथील खेळाचे मैदान, मनोरंजन मैदान, बाग, उद्याने खाजगी स्वयंसेवक संस्थांना दत्तक देण्याबाबत

**(२) १५०९३ (०७-०४-२०१५). श्री.राज पुरोहित (कुलाबा), श्री.अतुल भातखळकर (कांदिवली पूर्व) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) कुलाबा (मुंबई) येथील खेळाचे मैदान, मनोरंजन मैदान, बाग, उद्याने खाजगी स्वयंसेवक संस्थांना दत्तक देण्याबाबतची योजना आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर योजनेअंतर्गत उक्त मालमत्ता यांचे खाजगीकरण होणार आहे काय,

(३) असल्यास, त्याचा लाभ सामान्य नागरिकांना घेता येणार आहे काय,

(४) असल्यास, खेळाचे मैदान, मनोरंजन मैदान, बाग, उद्याने यांच्या विकासाबाबत शासनाचे धोरण काय आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (२२-०६-२०१७) :**(१) व (२) बृहन्मुंबई महानगरपालिकेच्या दिनांक २२.०१.२००९ रोजीच्या परिपत्रकान्वये उद्याने, मनोरंजन मैदाने, बाग इत्यादी दत्तक योजनेंतर्गत खाजगी स्वयंसेवक संस्थांना देण्यास स्थगिती आहे.

त्यामुळे कुलाबा येथील खेळाचे मैदान, मनोरंजन मैदान, बाग, उद्याने खाजगी स्वयंसेवक संस्थांना दत्तक देण्याबाबतची योजना नाही.

(३), (४) व (५) महानगरपालिकेने ताब्यात घेतलेली उद्याने व मनोरंजन मैदाने कोणत्याही संस्थेस देण्यात आलेली नसून, त्यांचे परिरक्षण सद्य:स्थितीत महानगरपालिकेमार्फत करण्यात येत आहे.

तथापि, उद्याने व मनोरंजन मैदाने यांच्या परिरक्षणासाठी चे तात्पुरते धोरण प्रस्तावित असून, त्यास महानगरपालिकेच्या सुधार समितीने डिसेंबर, २०१६ मध्ये मान्यता दिली आहे. परंतु या तात्पुरत्या धोरणास महानगरपालिकेची अद्यापि मान्यता मिळालेली नाही.

प्रस्तावित तात्पुरते परिरक्षण धोरण :-

- सदर कालावधी दत्तक दत्त्वावर मानण्यात येणार नाही.
- सदर व्यवस्था ११ महिने किंवा दत्तक धोरणाला मान्यता मिळेपर्यंत जे अगोदर असेल तेवढ्या कालावधीसाठी राहील.
- त्याअंतर्गत भूखंड ११ महिनयांसाठी केवळ परिरक्षणाकरीता संस्थांच्या ताब्यात देण्यात येथील.

- परिरक्षणासाठी देण्यात येणाऱ्या भूभागांवर सर्वसामान्य नागरीकांना प्रवेश व सर्व सोयी सुविधा नि:शुल्क देणे बंधनकारक असेल.

उद्याने व मनोरंजन मैदाने दत्तक तत्त्वावर देण्याचे धोरण महानगरपालिकेमार्फत सर्वकष विचार करुन पुनर्विलोकित करण्यात येत आहे.

---

## राज्यात मैला शुध्दीकरण प्रकल्पातील कंत्राटी कामगारांना सुरक्षा साधने आणि सुरक्षा पुरविण्याबाबत

**(३) १६६८२ (११-०८-२०१५). श्री.भारत भालके (पंढरपूर), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी), डॉ.संतोष टारफे (कळमनुरी), श्री.विजय काळे (शिवाजीनगर), श्री.भिमराव तापकीर (खडकवासला) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यात मैला प्रकरणी शुध्दीकरण प्रकल्पातील कंत्राटी कामगारांना सुरक्षा साधने आणि सुरक्षा पुरविणे ही महानगरपालिका प्रशासन तसेच संबधित ठेकेदाराची जबाबदारी असूनही प्रशासन आणि ठेकेदरांच्या गलथान कारभारामुळे या कामगारांच्या आरोग्याचा भीषण प्रश्न निर्माण झाला असल्याचे दिनांक १८ मे, २०१५ रोजी वा त्या सुमारास निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, महापालिकेत अनेक ठेकेदार हे कंत्राटी कामगारांची पिळवणूक करीत असल्याच्या घटना यापुर्वीही घडल्या आहेत, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उपरोक्त प्रकरणी कोणत्याही सुविधांच्या व्यतिरिक्त चक्क मैलामिश्रीत पाण्यात आणि गाळात काम करणाऱ्या कामगारांना योग्य न्याय मिळण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (२५-०६-२०१७)** :(१) एकूण २७ महानगरपालिकांपैकी १९ महानगरपालिकांकडून प्राप्त अहवालाच्या आधारे हे खरे नाही.

(२) हे खरे नाही.

(३) कामगारांना संबंधित कंत्राटदारामार्फत गणवेश, हातमोजे, बुट, रेनकोट इ. साहित्य दरवर्षी उपल्ब्ध करुन देण्यात येते, तसेच त्यांच्या सोयीसुविधाबाबत योग्यप्रकारे काळजी महानगरपालिकांकडून घेण्यात येते.

(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

## मुंबई शहरातील बेरोजगारांना संधी उपलब्ध करुन विक्री स्टॉल उभारण्यासाठी जागा देण्याबाबत

**(४) २४९३१ (११-०८-२०१५). श्री.नितेश राणे (कणकवली) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मुंबई शहरातील बेरोजगारांना संधी उपलब्ध करुन देवून स्वस्त दराचे वडापाव विक्री स्टॉल उभारण्यासाठी जागा देण्यात आलेली आहे, त्याच धर्तीवर मुंबई शहरात गेली अनेक वर्षे नियमितपणे कार्यरत असलेल्या वृत्तपत्र विक्रेत्यांना अशाप्रकारचे स्टॉल उपलब्ध करुन द्यावेत तसेच चर्मकार समाजातील बांधवानाही रहदारीच्या कुठल्याही प्रकारचा अडसर निर्माण होणार नाही. अशा ठिकाणी स्टॉल उपलब्ध करुन द्यावे अशी मागणी तत्कालीन मुंबई प्रदेश भाजप अध्यक्ष व लोकप्रतिनिधी यांनी दिनांक १९ मार्च, २००९ रोजी मुंबई महानगरपालिकेचे तत्कालीन आयुक्त डॉ.जयराज फाटक यांना सादर केलेल्या निवेदनाद्वारे मागणी केलेली आहे, हे खरे आहे काय,
(२) तसेच, मुंबई शहरात चर्मकार, वृत्तपत्र विक्रेते अशा कष्टकरी समाजाच्या अडचणीचा गांभीर्याने विचार करुन त्यावर उपाययोजना करणे आवश्यक असल्याने आयुक्त बृहन्मुंबई महानगरपालिका यांना पाठविलेल्या मागणीच्या अनुषंगाने एक निवेदन मा.मुख्यमंत्री, प्रधान सचिव, नगर विकास विभाग आदींकडेही त्यावेळी केलेली आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, मुंबई शहर व उपनगरातील वृत्तपत्र विक्रेत्यांना तसेच चर्मकारांना विनाविलंब कायमस्वरुपी स्टॉल उपलब्ध करुन देण्याच्या दृष्टीने शासनाने कोणता निर्णय घेतला आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (२२-०६-२०१७) :**(१) हे खरे आहे.
(२), (३) व (४) मुंबईतील वृत्तपत्र विक्रेत्यांना स्टॉल लावू देण्यास परवानगी देण्याबाबत निवेदन प्राप्त झाले असून, फेरीवाला धोरणांतर्गत परवाने देतांना वृत्तपत्र विक्रेत्यांना स्टॉल लावू देण्यासाठी प्राधान्य देण्याबाबतच्या सूचना बृहन्मुंबई महानगरपालिकेस देण्यात आल्या आहेत.

---

## मुंबईतील शिवाजी पार्क येथील, महापौर निवासात, मा.शिवसेनाप्रमुख बाळासाहेब ठाकरे यांचे भव्य स्मारक उभारणेबाबत

**(५) ४४२१० (०५-०५-२०१६). श्री.सुनिल प्रभू (दिंडोशी), श्री.अमित साटम (अंधेरी पश्चिम), श्री.सुनिल शिंदे (वरळी) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) मुंबईतील शिवाजी पार्क येथील महापौर निवासात, मा.शिवसेनाप्रमुख बाळासाहेब ठाकरे यांचे भव्य स्मारक उभारणेबाबत मा.आयुक्त, बृहन्मुंबई महापालिका यांना शासनाने यापूर्वी घेतलेल्या निर्णयाची अंमलबजावणी करण्याकरीता दिनांक २१ जानेवारी, २०१६ रोजी लेखी पत्र पाठविले, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, सदरहू पत्रानुसार, मुंबई महापालिकेतर्फे कोणती कार्यवाही करण्यात आली वा येत आहे,
(३) तसेच, याबाबत सद्य:स्थिती काय आहे व किती कालावधीत स्मारक उभारण्याचे काम सुरु होवून पूर्ण होणे अपेक्षित आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (२२-०६-२०१७) :**(१) हे खरे आहे.

(२), (३) व (४) स्वर्गीय बाळासाहेब ठाकरे यांचे भव्य स्मारक उभारण्याकरिता, महानगरपालिकेच्या मंजुरीने आणि राज्य शासनाच्या मान्यतेने, आयुक्त, सोसायटी नोंदणी अधिनियम, १८६० अन्वये नोंदणी केलेल्या बाळासाहेब ठाकरे राष्ट्रीय स्मारक या संस्थेला, दिवंगत बाळासाहेब ठाकरे यांचे स्मारक उभारण्याच्या प्रयोजनासाठी, माहिम विभागातील सीटीएस/एफपी क्रमांक ५०१, ५०२ व १४९५ ही महानगरपालिकेच्या मालकीची स्थावर मालमत्ता, तीवर स्थित असलेल्या संरचनांसह, एक रुपया नाममात्र भाड्याने आणि राज्य शासनाकडून निश्चित करण्यात येतील अशा अटी शर्तींच्या अधिनतेने पट्टयाने देता येईल याबाबतचे विधेयक सन २०१७ च्या अर्थसंकल्पीय अधिवेशनात संमत करण्यात आलेले आहे.

तसेच, याबाबतची पुढील कार्यवाही सुरु आहे.

---

**राज्यात एलईडी दिवे लावण्याबाबत**

**(६) ४७४७७ (१७-०५-२०१६). श्री.अमित साटम (अंधेरी पश्चिम) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यात एलईडी दिवे लावण्याची घोषणा माहे मार्च, २०१५ मध्ये वा त्या सुमारास मा. मुख्यमंत्री यांनी केली होती, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर प्रकरणी स्थानिक लोकप्रतिनिधी यांनी मुंबई महापालिका आयुक्त यांच्या समवेत बैठक करुन धोरण आखले होते, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, सदर प्रकरणी शासनाने कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (२५-०६-२०१७) :**(१) हे खरे आहे.

(२) स्थानिक लोकप्रतिनिधी यांची आयुक्त, बृहन्मुंबई महानगरपालिका यांच्या समवेत दिनांक ०९.०२.२०१५ रोजी बैठक झाली होती. सदर बैठक राज्यात एलईडी पथदिवे लावण्याबाबत नव्हती. परंतु अंधेरी रेल्वे स्थानक परिसर सौंदर्यी करणाचाच भाग म्हणून सदर परिसरात सुशोभित पथदिवे (Decorative Street Light) बसविण्याच्या मुद्याबाबत चर्चा करण्यात आली.

(३) शासन परिपत्रक, नगर विकास विभाग, दिनांक ०४.१२.२०१५ अन्वये महानगरपालिकांच्या क्षेत्रात एलईडीचा वापर प्राधान्याने करण्याबाबत निदेश दिले आहेत.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

**औरंगाबाद शहराचा सुधारित आराखडा तयार करताना शहरातील जमिनदारांचा फायदा व सर्वसामान्यांच्या वसाहतींवर आरक्षण टाकण्यात आल्याबाबत**

**(७) ४९०८४ (१७-०५-२०१६). श्री.अतुल सावे (औरंगाबाद पूर्व) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) औरंगाबाद शहराचा सुधारित आराखडा तयार करताना शहरातील जमिनदारांचा फायदा व सर्वसामान्यांच्या वसाहतींवर आरक्षण टाकण्यात आल्याने संबंधित भ्रष्ट अधिकाऱ्यांची चौकशी करावी अशी मागणी लोकप्रतिनिधी व नगरसेवकांनी महानगरपालिकेचे आयुक्त नगररचना उपसंचालक यांचेकडे दिनांक १३ जानेवारी, २०१६ रोजी निवेदनाद्वारे केली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, याबाबत महानगरपालिका आयुक्त उपसंचालक नगररचना यांनी चौकशी पूर्ण केली आहे काय, त्यातील निष्कर्ष काय आहेत, त्यानुषंगाने शासनाने काय कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (२७-०६-२०१७) :**(१) व (२) दि. १३.०१.२०१६ रोजीचे निवेदन उपसंचालक, नगर रचना या कार्यालयास प्राप्त झाले नाही. मात्र अशा प्रकारच्या तक्रारी महानगरपालिका औरंगाबाद यांच्याकडे प्राप्त झालेल्या आहेत. या प्रकरणी मा.उच्च न्यायालय खंडपीठ औरंगाबाद येथे जवळ-जवळ १२ रिट याचिका दाखल झालेल्या असून त्यासंबंधी मा.उच्च न्यायालय, औरंगाबाद खंडपीठ यांनी दाखल रिट याचिकामधील, रिट याचिका क्र. १९८१/२०१६ व १९८२/२०१६ आणि इतर मध्ये दि. ०५/०८/२०१६ रोजी निर्णय पारीत केला आहे. या आदेशामध्ये प्रारुप सुधारीत विकास योजना, औरंगाबाद चे अनुषंगाने महानगरपालिका औरंगाबाद यांनी दि. ०४/०२/२०१६ रोजी कलम २६ नुसार प्रसिध्दीकरणाची केलेली कार्यवाही रद्द ठरवून, महाराष्ट्र प्रादेशिक व नगररचना अधिनियम, १९६६ चे कलम २१ (४ क) अन्वये अधिकाऱ्यांची नेमणूक करुन उर्वरित पुढील कार्यवाही करण्याचे आदेश पारीत केलेले आहेत. या आदेशाच्या विरोधात मा.महापौर, औरंगाबाद महानगरपालिका यांनी मा.सर्वोच्च न्यायालय येथे प्रस्तुत याचिका दाखल केल्या आहेत. त्यात अद्याप अंतिम निर्णय झालेला नाही. सदर बाब ही न्यायप्रसिष्ठ असून पुढील कार्यवाही करणे उचित होणार नाही.

(३) लागू नाही.

---

## मुंबईतील दहिसर, ओशिवरा, पोयसर व मिठी या चार नद्यांमध्ये सोडण्यात येणाऱ्या सांडपाण्याबाबत

**(८) ५४१३२ (२६-०८-२०१६). श्री.मंगलप्रभात लोढा (मलबार हिल) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मुंबईतील दहिसर, ओशिवरा, पोयसर व मिठी या चार नद्यांमध्ये नदीकाठी वसलेल्या वस्त्यांमधून, कारखान्यांमधून व इमारतींमधून सोडण्यात येणारे सांडपाणी तसेच रासायनीक पाण्यामुळे होणारे प्रदुषण रोखण्यासाठी 'चेंज डॉट ऑर्ग' या ऑनलाईन व्यासपीठाच्या माध्यमातून मा.मुख्यमंत्री यांच्याकडे ऑनलाईन याचिका दिनांक १५ एप्रिल, २०१६ रोजी वा त्यासुमारास सादर करण्यात आली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर ऑनलाईन याचिकेनुसार मुंबईतील चारही नद्या प्रदुषणमुक्त करण्याबाबत शासनाने कोणता निर्णय घेतला आहे वा पर्यायी उपाययोजना केली आहे,
(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहे ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (२२-०६-२०१७) :**(१) हे खरे आहे.
(२) व (३) मुंबईतील चारही नद्या प्रदुषणमुक्त करण्यासाठी महानगरपालिकेमार्फत पुढीलप्रमाणे कार्यवाही करण्यात येत आहे :-

- महाराष्ट्र प्रदुषण नियंत्रण मंडळामार्फत प्राप्त दिनांक ११.१२.२०१३ रोजीच्या नोटीशीनुसार मिठी नदी व वाकोला नदीमध्ये होणाऱ्या प्रदुषणास प्रतिबंध करावयाच्या विविध कामांच्या अंमलबजावणीच्या अनुषंगाने महापालिका उपायुक्त (परि-५) यांची नोडल अधिकारी म्हणून नियुक्ती करण्यात आलेली आहे.
- सदर नद्यांमध्ये घरगुती सांडपाणी व मलजलप्रवाह यामुळे होत असलेल्या प्रदुषणावर प्रतिबंध करण्यासाठी उपाययोजना सुचविण्याकरिता भारतीय प्राद्योगिकी संस्था, मुंबई यांची सल्लागार म्हणून नियुक्ती करण्यात आली आहे.
- सदर संस्थेने स्थळपरीक्षण करुन नाल्याचे पाणी, प्रवाहाचे प्रमाण व विविध प्रदुषण घटकांच्या मात्रांचे मुल्यांकन करुन प्रदुषण निर्मलन / प्रतिबंधाकरिता राबवावयाच्या उपाययोजनांचा अहवाल सादर करण्यात आला आहे.
- अहवालाचे निरीक्षण करुन त्याची अंमलबजावणी करण्यासाठी अभ्यास गटाची नियुक्ती करण्यात आलेली असून त्यानुसार पुढील कार्यवाही करण्यात येणार आहे.

---

### लातूरमध्ये पाणी टंचाईच्या काळात नविन बांधकामास परवानगी दिल्याबाबत

**(९) ५७९६२ (२९-०८-२०१६). श्री.जयप्रकाश मुंदडा (बसमत) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) लातूरमध्ये पाणी टंचाई असल्यामुळे जिल्हाधिकारी, लातूर व आयुक्त, महानगरपालिका यांनी दिनांक १ मार्च, २०१६ पासून शहरात नविन बांधकाम करण्यास परवानगी देवू नये असे पत्रक काढले असतांनाही दिनांक १ मार्च, २०१६ नंतर सहाय्यक नगररचनाकार यांनी आदेशाचे पालन न करता बांधकाम परवाने दिले आहेत, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, याबाबत तक्रार करण्यात आली आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, तक्रारीच्या अनुषंगाने काय कारवाई करण्यात आली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (२३-०६-२०१७) :**(१) हे खरे आहे.
(२) हे खरे आहे.

(३) प्राप्त तक्रारीच्या अनुषंगाने तत्कालीन नगररचनाकार तथा सहायक नगररचनाकार यांच्या विरुध्द विभागीय चौकशी करुन, विभागीय चौकशी अहवालातील निष्कर्षाच्या आधारे संबंधितांविरुध्द शिस्तभंगाची कारवाई लातूर शहर महानगरपालिका यांचेकडुन करण्यात येत आहे.

(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

**मुंबई महापालिकेच्या २७४ उडाणपुलाच्या बांधकामाचे लेखापरीक्षण करण्याबाबत**

**(१०) ६५१८९ (१६-०१-२०१७). डॉ.मिलिंद माने (नागपूर उत्तर) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मुंबई महापालिकेने शहरातील २७४ पुलाचे तातडीने बांधकाम लेखापरीक्षण करण्याचा निर्णय घेतला असुन या उड्डाणपुलांच्या लेखापरीक्षणाच्या सुमारे २ कोटी रूपयांच्या खर्चाला स्थायी समितीची मंजुरी मिळालेली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, मुंबई शहरातील काही पुलांचा पुरेसा तपशील महानगरपालिकेच्या तांत्रिक विभागाकडे उपलब्ध नाही, तसेच सदर पुलांवर अथवा भिंतीला लागून असलेल्या अनधिकृत बांधकामाबाबत शासनाने कोणता निर्णय घेतला वा घेण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबनाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (२१-०६-२०१७) :**(१) बृहन्मुंबई महानगरपालिकेच्या शहर, पश्चिम उपनगरे व पूर्व उपनगरे विभागातील सर्व पुलांची विस्तृत माहितीसह सूची बनवून स्थितीदर्शक सर्वेक्षण करण्याकरिता सुमारे दोन कोटी रुपयांच्या खर्चाला स्थायी समितीची मंजुरी मिळाली आहे.

(२) व (३) मुंबईतील काही पूल खूप जुने असून ते विविध शासकीय यंत्रणेमार्फत बांधण्यात आलेले आहेत. त्यामुळे स्थितीदर्शक सर्वेक्षण करण्याकरिता लागणारी आवश्यक माहिती संकलित करुन वेळोवेळी पुलांचे निरीक्षण करणे व आवश्यक त्या उपाययोजना करुन त्यांची महानगरपालिकेमार्फत अंमलबजावणी करण्यात येणार आहे.

---

**मुंबई महानगरपालिकेच्या अधिकाऱ्यांवर कारवाई होण्याबाबत**

**(११) ६५२४४ (१६-०१-२०१७). श्री.सुनिल शिंदे (वरळी) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मुंबई महानगरपालिकेच्या विभाग क्र.६५ मधील एका नगरसेविकेच्या पतीने केलेले बेकायदा बांधकाम पाडण्याचे आदेश मा.मुंबई उच्च न्यायालयाने दिले असतानाही सदर बांधकाम नियमित करण्याचे आदेश महानगरपालिकेच्या संबंधित अधिकाऱ्यांनी काढले असल्याची बाब माहे ऑक्टोबर, २०१६ च्या तिसऱ्या आठवड्यात वा त्या दरम्यान निदर्शनास आली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर प्रकरणी शासनाकडून चौकशी करण्यात आली आहे काय,
(३) असल्यास, सदर चौकशीत काय निष्पन्न झाले आहे व त्यानुसार न्यायालयीन आदेशाचा अवमान करणाऱ्या संबंधित दोषी अधिकाऱ्यांवर शासनाकडून कोणती कारवाई करण्यात आली वा येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (२२-०६-२०१७) :**(१) बृहन्मुंबई महानगरपालिकेच्या विभाग क्रमांक ६५ च्या नगरसेविकेच्या पतीने त्यांच्या विलेपार्ले (पश्चिम), बजाज रोड येथील कुंज विहार बंगल्यातील अनधिकृत बांधकाम नियमित करणे तसेच, अंतर्गत वाढीव फेरबदल व बंगल्याच्या तळमजल्यावरील मागील बाजू व पडघर / वाहनतळ या जागेत बँकेसाठी वापरातील बदल याबाबतचा प्रस्ताव मे. पार्थ आर्किटेक्ट कन्सल्टन्ट यांच्यामार्फत दिनांक २४.०६.२०१३ रोजी महानगरपालिकेस सादर केला.

महानगरपालिकेने दिनांक ०५.०५.२०१४ रोजी नियमितीकरण वापरातील प्रस्तावित बँक म्हणून फेरबदल, खुल्या जागेची उणीवा आणि तीन पार्किंग जागेची कमतरता अधिमुल्य आकारुन सुट देणे इत्यादी सवलतींना मान्यता दिली.

तद्नंतर वास्तुविशारदाने वेळोवेळी सुधारणांसह सादर केलेल्या आराखडयास महानगरपालिकेने मंजुरी दिली.

तथापि, सुधारीत आराखडे मंजुर न करण्याबाबत मा. उच्च न्यायालयाने कोणताही मनाई आदेश दिलेला नसल्याने रु. १२,०७,८६०/- नियमितीकरण फी व इतर रक्कम भरुन सुधारीत आराखडयाच्या प्रस्तावास महानगरपालिकेने दिलेली मंजुरी मा.उच्च न्यायालयाच्या दि.१८.११.२०१६ रोजीच्या मौखिक आदेशानुसार मागे घेण्यात आली आहे व याबाबत जागेचे मालक व वास्तुविशारद यांना दिनांक २१.१२.२०१६ रोजीच्या पत्रान्वये कळविण्यात आले आहे.
(२) सदर प्रकरणी महानगरपालिकेमार्फत चौकशी करण्यात आली आहे.
(३) कुंजविहार बंगल्यातील गॅरेजमधील अनधिकृत बांधकामाबाबत चौकशी करुन सादर केलेल्या अहवालावर महानगरपालिकेमार्फत संबंधित अधिकाऱ्यांवर पुढीलप्रमाणे कारवाई करण्यात आली आहे :-

• उपप्रमुख अभियंता (इ.प्र.) (प.उपनगरे) व सहाय्यक आयुक्त (के/पश्चिम) यांना अनुक्रमे दिनांक १५.०४.२०१७ व १७.०४.२०१७ रोजी अभिलेखित ताकीद ज्ञापन बजावण्यात आले आहे.
• उपकायदा अधिकारी यांची एक वेतनवाढ कायमस्वरुपी रोखण्यात आली आहे.

(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

### मुंबईतील सफाई कामगारांच्या हक्काच्या घरांच्या उभारणीमध्ये होत असलेल्या विलंबाबाबत

**(१२) ६५४४४ (१६-१२-२०१६). ॲड.पराग अळवणी (विलेपार्ले), ॲड.आशिष शेलार (वांद्रे पश्चिम), श्री.नरेंद्र पवार (कल्याण पश्चिम), श्री.जयप्रकाश मुंदडा (बसमत), श्री.शिरीषदादा चौधरी (अमळनेर), श्री.गणपत गायकवाड (कल्याण पूर्व) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मुंबई महापालिकेतील सफाई कामगारांच्या वसाहतींसाठी महापालिकेने आश्रय योजना सुरु करण्याची घोषणा सहा वर्षांपूर्वी केली असून यासाठी तब्बल १८०० कोटी रुपये खर्च करण्यात येणार असल्याचे निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, ६००० ते ६५०० घरे निर्माण करण्याचे प्रस्तावित असतांना गेल्या पाच वर्षात केवळ दोनच वसाहतींच्या पुनर्विकासाची योजना तयार केल्याचे समोर आले आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, उर्वरित सफाई कर्मचाऱ्यांच्या वसाहती पूर्णपणे जीर्ण अवस्थेत असून सदर कर्मचारी हे आपला जीव मुठीत घेऊन जगत असल्याचे निदर्शनास आले, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, याबाबत चौकशी करण्यात आली आहे काय,
(५) तसेच मुंबईकरांच्या सुदृढ आरोग्यासाठी घाणीमध्ये काम करणाऱ्या सफाई कामगारांच्या हक्काच्या घरांच्या उभारणीसाठी शासनाने काय उपाययोजना केली वा करण्यात येत आहे,
(६) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (२१-०६-२०१७)** :(१), (२), (३), (४), (५) व (६) बृहन्मुंबई महानगरपालिकेतील सफाई कामगारांच्या वसाहतींसाठी बृहन्मुंबई महानगरपालिकेमार्फत आश्रय योजना सुरु करण्यात आली आहे.

सदर योजनेंतर्गत बृहन्मुंबई महानगरपालिकेतील सुमारे २८,००० सफाई कर्मचाऱ्यांच्या वसाहतींचा पुनर्विकास करुन सेवा कालावधीत सदनिका उपलब्ध करुन देणे नियोजित आहे. याकरिता सद्य:स्थितीत ३९ ठिकाणी असलेल्या सफाई कामगारांच्या वसाहतींचा विकास नियंत्रण नियमावलीनुसार कमाल ४ चटईक्षेत्र निर्देशांक वापरुन महानगरपालिकेमार्फत पुनर्विकास करावयाचे नियोजित आहे.

राज्यातील नगरपालिकेतील / महानगरपालिकेतील ज्या सफाई कामगारांची सेवा २५ वर्षे किंवा त्याहून अधिक झाली आहे अशा सफाई कामगारांना सेवानिवृत्तीनंतर किंवा सफाई कामगारांचा सेवेत असतांना मृत्यू झाल्यास, अशा सफाई कामगारांच्या पात्र वारसांना मालकी तत्वावर २६९ चौ. फुट चटई क्षेत्राच्या सदनिका मोफत उपलब्ध करुन देण्यासाठी ४ या कमाल चटईक्षेत्र निर्देशांकाच्या मर्यादेत बांधण्यात येणाऱ्या सदनिकांपैकी ५०% सदनिका सेवानिवासस्थान म्हणून व उर्वरित ५०% सदनिका डॉ.बाबासाहेब आंबेडकर श्रमसाफल्य योजनेंतर्गत उपलब्ध करुन देण्यास दिनांक १२ जून, २०१५ च्या शासन निर्णयान्वये मान्यता देण्यात आली आहे.

मुंबई शहर आणि उपनगरातील मंजुरीकरिता सादर करण्यात आलेल्या २५ वसाहतींच्या प्रस्तावांपैकी शहर विभागातील एकूण ७ वसाहतींच्या पुनर्विकासाचे प्रस्ताव मंजुर करण्यात आले आहेत.

या ७ मंजूर प्रस्तावांपैकी "ए" विभागातील कोचीन स्ट्रीट येथे पुनर्विकासाचे काम सुरु झाले आहे. तसेच, गौतम नगर व सिध्दार्थ नगर येथील पुनर्विकास योजनेच्या निविदा मागविण्याचे काम प्रगतीपथावर आहे. उर्वरित ४ ठिकाणच्या पुनर्विकास योजनेच्या कामाचे अंदाजपत्रक बनविण्याचे काम सल्लागारामार्फत प्रगतीपथावर आहे.

पूर्व व पश्चिम उपनगरे येथील १९ वसाहतींच्या पुनर्विकासाचे नियोजन आणि आराखडे करण्याकरिता महानगरपालिका वास्तुशास्त्रज्ञ यांचेमार्फत ७ ठिकाणी सल्लागाराची नियुक्ती करण्यात आली असून, १२ ठिकाणी सल्लागाराची नियुक्ती करण्याचे काम प्रगतीपथावर आहे.

सद्य:स्थितीत महानगरपालिकेच्या घन कचरा व्यवस्थापन खात्याच्या सफाई कामगारांच्या इमारत दुरुस्ती कामांकरिता सन २०१६-१७ करिता एकूण रु.३.९० कोटी व सन २०१७-१८ करिता एकूण रु. ४८.३१ कोटी इतक्या रकमेची तरतूद करण्यात आली आहे.

---

**मुंबईतील अनधिकृत बांधकामांच्या प्राप्त तक्रारींबाबत**

**(१३) ६५४५० (१६-०१-२०१७). ॲड.पराग अळवणी (विलेपार्ले), ॲड.आशिष शेलार (वांद्रे पश्चिम) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मुंबईतील विविध नागरी समस्यांसाठी महानगरपालिकेच्या संपर्क क्रमांकावर येत असलेल्या तक्रारींमध्ये तब्बल ७० हजार तक्रारी या अनधिकृत बांधकामांबाबत आल्या असल्याचे निदर्शनास आले आहेत, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, या अनधिकृत बांधकामांच्या तक्रारीपैकी ५० टक्के तक्रारी या कुर्ला, गोवंडी व चेंबूर परिसरातील आहेत, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, सदर अनधिकृत बांधकामांबाबत चौकशी करण्यात आली आहे काय, चौकशीत काय आढळुन आले, त्यानुसार कोणती कारवाई करण्यात आली वा येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (२१-०६-२०१७) :**(१) दिनांक ०१.०४.२०१६ ते दिनांक ३१.०३.२०१७ या कालावधीत महानगरपालिकेच्या संपर्क क्रमांक १९१६ वर अनधिकृत बांधकामाबाबतच्या एकूण ५३,८९५ तक्रारी प्राप्त झाल्या आहेत.

(२) सदर अनधिकृत बांधकामांच्या तक्रारींपैकी कुर्ला, गोवंडी व चेंबूर येथील तक्रारींची संख्या अनुक्रमे ५२७३, १९११ व १७६७ अशी आहे.

(३) अनधिकृत बांधकामांविरुध्द कार्यवाही करण्याकरिता महानगरपालिकेमार्फत सहाय्यक अभियंता दर्जाचे "पदनिर्देशित अधिकारी" नेमण्यात आले असून त्यांना मुंबई महानगरपालिका अधिनियम १८८८ व महाराष्ट्र प्रादेशिक व नगररचना अधिनियम १९६६ अंतर्गत अनधिकृत बांधकामास कारणे दाखवा नोटीस देणे, कागदपत्रे तपासणे व अंतिम आदेश पारित करणे व निष्कासन कारवाई करणे याबाबतचे अधिकार व कर्तव्य नेमून देण्यात आले आहेत.

झोपडपट्टी परिसरामधील अनधिकृत बांधकामांवर कार्यवाही करण्यासाठी महानगरपालिका क्षेत्रात "सहाय्यक आयुक्त" आणि शासनाचे व खाजगी जागेवरील झोपडपट्टीमधील अनधिकृत बांधकामांविरुध्द कार्यवाही करण्याकरिता "उपजिल्हाधिकारी (अतिक्रमण निष्कासन)" यांची सक्षम प्राधिकारी म्हणून नियुक्ती करण्यात आली आहे.

अनधिकृत बांधकामांवर नियंत्रण ठेवण्यासाठी प्राप्त तक्रारींची संगणक प्रणालीमध्ये नोंद घेण्यात येऊन विहित कायदेशीर प्रक्रियेनुसार कारवाई करण्यात येते.

अनधिकृत बांधकामावर कारवाई करण्यासाठी हयगय करणाऱ्या अधिकाऱ्यांविरुध्द खातेनिहाय चौकशी करण्यात येऊन शिस्तभंगाची कारवाई करण्यात येते.

दिनांक ०१.०४.२०१६ ते ३१.०३.२०१७ पर्यंतच्या अनधिकृत बांधकामांना महानगरपालिकेमार्फत नोटीस देऊन कारवाई करण्यात आली आहे.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

**हटकेश सोसायटी जेव्हीपीडी स्कीम येथे विकासकाने एफएसआयचे उल्लंघन केल्याबाबत**

**(१४) ६५९४३ (१६-०१-२०१७). श्री.नितेश राणे (कणकवली) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) विलेपार्ले पश्चिम (मुंबई) येथील हटकेश सोसायटी जेव्हीपीडी स्कीम, जूहू प्लॉट क्र.५८, सीटीएस क्र.७२३, एनएस रोड क्र.७ या क्षेत्रावर विकास करताना विकासकाने महानगरपालिकेने दिलेल्या परवानगीपेक्षा अधिक म्हणजे १, १०, ००० चौ. फूट ऐवढ्या मोठया प्रमाणावर एफएसआयचे उल्लंघन केले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, बेकायदेशीर व अनधिकृत बांधकामामुळे रुपये ५५ कोटीचा महसूल बुडाला असल्याने विकासक व अनधिकृत बांधकामाविरुध्द तसेच संबंधीत अधिकारी यांच्याविरुध्द कारवाई करण्यात यावी अशा आशयाच्या मागणीचे निवेदन इफतेखार ऐ शाह या सामाजिक व माहिती अधिकार कार्यकर्त्यानी महानगरपालिकेचे सहाय्यक अभियंता, बिल्डिंग प्रपोजल, पश्चिम उपनगरे बांद्रे (प), कार्यकारी अभियंता,बिल्डिंग प्रपोजल पश्चिम उपनगरे, बांद्रा यांना दिनांक ७ डिसेंबर, २०१०, दिनांक १४ डिसेंबर, २०१० व दिनांक २२ फेब्रुवारी, २०११ रोजी दिले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, विकासकाविरुध्द तक्रारी करूनही संबंधित अधिकाऱ्यांनी कोणतीही कारवाई न केल्यामुळे श्री.इफतेखार ऐ शाह यांनी मा.आयुक्त महानगरपालिका यांच्याकडे दिनांक २५ एप्रिल, २०११ रोजी निवेदन सादर करून कारवाई करण्याची मागणी केली आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, उक्त तक्रारीच्या अनुषंगाने महापालिका प्रशासनाने केलेल्या कारवाईसंदर्भात माहिती अधिकारात श्री.इफतेखार ऐ शाह यांनी माहिती मागविली असता, बिल्डिंग प्रपोजल विभागाने एमआयपीटी ॲक्टच्या कलम ५३(१) नुसार दिनांक १० फेब्रुवारी, २०११ रोजी कारवाई केली असे कळविले परंतु प्रत्यक्षात त्यावेळी विकासकाविरोधात कोणतीही कारवाई करण्यात आलेली नव्हती, हे ही खरे आहे काय,

(५) असल्यास, सदर प्रकरणी चौकशी करुन दोषींविरोधात तसेच विकासकाच्या अनधिकृत बांधकामाविरोधात कोणती कारवाई करण्यात आली वा येत आहे, नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (२१-०६-२०१७) :**(१) हे खरे नाही.
(२) व (३) सदर अनधिकृत बांधकाम व संबंधित अधिकारी यांच्याविरुध्द कारवाई करण्याबाबतचे निवेदन श्री. इफ्तेखार ए. शाह यांनी महानगरपालिकेचे सहाय्यक अभियंता (इमारत प्रस्ताव), पश्चिम उपनगरे, वांद्रे यांना दिनांक ०७ डिसेंबर, २०१०, १४ डिसेंबर, २०१० व २२ फेब्रुवारी, २०११ रोजी दिले होते. तसेच, याबाबत श्री. इफ्तेखार शाह यांनी दिनांक २५ एप्रिल, २०११ रोजी आयुक्त, बृहन्मुंबई महानगरपालिका यांना निवेदन दिले होते.
(४) व (५) श्री.इफ्खार ए. शाह यांनी केलेल्या तक्रारींच्या अनुषंगाने, बृहन्मुंबई महानगरपालिकेमार्फत हटकेश सोसायटी या इमारतीचे निरीक्षण करुन विकासक / वास्तुविशारद यांना दिनांक १०.०१.२०११ रोजी एम.आर.टी.पी. कलम ५३(१) अन्वये नोटीस बजावण्यात आली. विकासकाने विहित मुदतीत निष्कासन न केल्याने महानगरपालिकेने स्थानिक पोलीसांच्या मदतीने दिनांक २४.०३.२०११ रोजी सदर इमारतीतील वाढीव बांधकाम निष्कासित केले व उर्वरित बांधकाम आर.सी.सी. कन्सल्टंटच्या सल्ल्याने स्वत: काढून घेणार असल्याचे वास्तुविशारदाने दिनांक १९.०४.२०११ रोजीच्या पत्रान्वये कळविले.

सदर तोडलेले बांधकाम भोगवटाधारकांनी पुन:श्च केल्याची तक्रार प्राप्त होताच सदर भोगवटाधारकांवर मुंबई महानगरपालिका अधिनियम १८८८ च्या कलम ४८८ अंतर्गत नोटीसा बजावण्यात आल्या. सदर नोटीसला विकासकाने दिवाणी न्यायालयात एल.सी.सुट क्रमांक २०७३/२०११ अन्वये आव्हान दिल्यानंतर, मा. न्यायालयाने महानगरपालिकेच्या कारवाईस स्थगिती आदेश दिले आहेत. मा. न्यायालयाच्या आदेशानुसार बृहन्मुंबई महानगरपालिकेमार्फत पुढील योग्य ती कारवाई करण्यात येणार आहे.

सदर इमारतीत भोगवटा प्रमाणपत्राशिवाय रहात असलेल्या सदनिकाधारकांवर मुंबई महानगरपालिका अधिनियम १८८८ च्या कलम ३५३(अ) अन्वये नोटीस बजावण्यात आली असून त्यांचेविरुध्द विलेपार्ले येथील मा.महानगर दंडाधिकारी यांचे न्यायालयात क्रमांक ३९१८/एसएस/२०१४ अन्वये दावा दाखल करण्यात आला आहे. सदर प्रकरण न्यायप्रविष्ठ आहे.

---

## मुंबई महापालिकेने १५०० वृक्ष तोडण्याचा घेतलेला निर्णय

**(१५) ६६४६९ (१३-०२-२०१७). श्री.राहुल जगताप (श्रीगोंदा), श्री.वैभव पिचड (अकोले), श्री.जितेंद्र आव्हाड (मुंब्रा कळवा), श्री.पांडुरंग बरोरा (शहापूर), श्रीमती दिपिका चव्हाण (बागलाण), श्री.नरहरी झिरवाळ (दिंडोरी), श्री.राजेंद्र नजरधने (उमरखेड), श्री.गणपत गायकवाड (कल्याण पूर्व) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) मुंबई महापालिकेने मुंबईस्थित असलेल्या दोन बडया विकासकांसाठी १५०० वृक्ष तोडण्याचा निर्णय घेतला असल्याचे माहे सप्टेंबर, २०१६ च्या दुसऱ्या आठवड्यात निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय,
(३) असल्यास, चौकशीत काय आढळून आले व तद्नुसार पर्यावरणाची हानी होऊ नये म्हणून सदरचा निर्णय रद्द करणेबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (२१-०६-२०१७) :**(१) हे खरे नाही.
(२), (३) व (४) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

### नाशिक महानगरपालिकेच्या अग्निशमन दलाबाबत

**(१६) ६७६८१ (१६-१२-२०१६). श्रीमती निर्मला गावित (इगतपूरी), श्री.अस्लम शेख (मालाड पश्चिम), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी), डॉ.संतोष टारफे (कळमनुरी), श्री.कुणाल पाटील (धुळे ग्रामीण), श्री.बाळासाहेब थोरात (संगमनेर) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) शासनाने दिनांक ३० ऑक्टोबर, २०१४ रोजीच्या परिपत्रकानुसार १५ मीटर उंच इमारती तसेच हॉस्पीटल, हॉटेल्स व अन्य व्यावसायिक आस्थापनाकडून एकाचवेळी अग्निशमन शुल्क घेऊन त्यापुढे प्रत्येक सहा महिन्यांच्या अंतरावर अग्नीप्रतिबंधक व्यवस्थेच्या ऑडीटचा अहवाल घ्यावा असे आदेश दिले आहेत, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, नाशिक महानगरपालिकेच्या अग्निशमन दलाने या आदेशाला महासभेसमोर न ठेवताच दर सहा महिन्याने नूतनीकरण शुल्क घेण्याची प्रक्रिया सुरु ठेवली आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, उपरोक्त प्रकरणाची शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीअंती कोणती कार्यवाही करण्यात आली वा येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (२३-०६-२०१७) :**(१) महाराष्ट्र अग्निशमन सेवा संचालनालयाने ना-हरकत दाखले नुतनीकरणासंदर्भात दि.३०.१०.२०१४ च्या परिपत्रकान्वये दिलेल्या सुचना संचालनालयाच्या संकेतस्थळावर प्रसिध्द केल्या आहेत.
(२) सदर परिपत्रकानुसार, नाशिक महानगरपालिकेने जुलै २०१६ पासून नुतनीकरणाची पध्दत बंद केली असून, महानगरपालिकेने महासभेची मान्यता घेतली आहे.
(३) प्रश्न उद्‌भवत नाही.
(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

### मुंबई महानगरपालिकेच्या पुलांच्या कंत्राटाबाबत

**(१७) ६७८२३ (१६-०१-२०१७). श्री.अस्लम शेख (मालाड पश्चिम) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) मुंबई महानगरपालिकेच्या स्थायी समितीत मंजूर झालेल्या शिवदास चापसी हॅकॉक पूल, यारी रोड व लोखंडवाला बॅक रोड जक्शन पूल, विक्रोळी रेल्वे स्टेशन येथील लेव्हल क्रॉसिंग क्रमांक १४ सी रेल्वे पूल व मिठी नदीवरील ड्राईव्ह इन थिएटर जवळील पुलाचे रुंदीकरण व पुर्नबांधणी या चार पुलांची कंत्राटे उच्च न्यायालयाच्या आदेशाने रद्द करण्यात आली असल्याचे माहे ऑगस्ट, २०१६ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, या पुलांचे कंत्राट नव्याने काढण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (२१-०६-२०१७)** :(१) हे खरे आहे.
(२) व (३) मा.उच्च न्यायालयाने सदर कामांचे कंत्राट रद्द करण्याचे आदेश पारित केल्यानंतर, बृहन्मुंबई महानगरपालिकेमार्फत पुनर्निविदा मागविण्याची प्रक्रिया सुरु करण्यात आली होती.
तथापि, महानगरपालिकेमार्फत नियुक्त केलेल्या ठेकेदारांनी मा.उच्च न्यायालयाच्या आदेशाविरुध्द मा.सर्वोच्च न्यायालयात याचिका दाखल केली आहे.
सदर प्रकरण न्यायप्रविष्ठ असून, मा.सर्वोच्च न्यायालयाच्या निर्णयानुसार महानगरपालिकेमार्फत पुढील कार्यवाही करण्यात येईल.

---

**कल्याण-डोंबिवली महानगरपालिका हद्दीतील बल्याणी परिसरातील अवैध बांधकामे**

**(१८) ६९६८३ (१६-०१-२०१७). श्री.संजय पुराम (आमगाव), श्री.गणपत गायकवाड (कल्याण पूर्व), श्री.नरेंद्र पवार (कल्याण पश्चिम), ॲड.पराग अळवणी (विलेपार्ले), ॲड.आशिष शेलार (वांद्रे पश्चिम), श्री.किसन कथोरे (मुरबाड) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) कल्याण-डोंबिवली महानगरपालिका हद्दीतील टिटवाळा जवळच्या बल्याणी परिसरातील मध्यमवर्गीय लोकांच्या भुखंडावर अवैधरित्या शेकडो चाळी स्थानिक माफियांनी महापालिका अधिकाऱ्यांशी संगनमत करुन बांधल्या आहेत, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, सदरची बेकायदा बांधकामे काही कालावधीनंतर महापालिकाच तोडत असल्याने सामान्य नागरिकांची लाखो रुपयांची फसवणूक झाल्याचे दिनांक १० ऑक्टोबर, २०१६ रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आले, हे खरे आहे काय,
(३) असल्यास, उक्त प्रकरणी संबंधितांवर शासनाकडून कोणती कारवाई करण्यात आली वा येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (२१-०६-२०१७)** :(१) हे खरे नाही.
(२) माहे ऑक्टोबर, २०१६ या कालावधीत बल्याणी परिसरातील अनधिकृतपणे सुरु असलेल्या ३ गाळे, ७ खोल्या व ५२ जोते अशा एकूण ६२ अनधिकृत बांधकामांवर महानगरपालिकेमार्फत निष्कासनाची कारवाई करण्यात आली आहे.
तसेच बल्याणी परिसरातील नागरिकांकडून अशाप्रकारची कोणतीही तक्रार महानगरपालिकेस प्राप्त झालेली नाही.
(३) व (४) प्रश्न उद्भवत नाही.

---

**मुंबई महानगरपालीकेतील देखभाल विभागातील १२ अभियंत्यांना दोषी ठरविल्याबाबत**

**(१९) ७०५७७ (१६-०१-२०१७). श्री.विजय वडेट्टीवार (ब्रम्हपूरी), श्री.सुनिल केदार (सावनेर), श्री.अमर काळे (आर्वी) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मुंबई महानगरपालीकेत सन २००५ ते २००९ या कालावधीत शहर विभागातील ए, बी, सी, डी, जी दक्षिण या वार्डात लाद्या बसविणे, पायवाटा बांधणे यासह लाहनमोठे कामे कंत्राटदारांना देण्यात आले होते परंतु सदर कंत्राटदारांची देयके थकित ठेवल्याप्रकरणी सन २०१२ मध्ये महापालीकेने देखभाल विभागातील १२ अभियंत्यांना दोषी ठरविले होते, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर अभियंता आणि कंत्राटदार यांनी संगनमताने अनेक कामे अवैध व निकृष्ट दर्जाची केली आहेत, हेही खरे आहे काय,

(३) असल्यास, या प्रकरणी चौकशी करण्यात आली आहे काय,

(४) असल्यास, चौकशीत काय आढळून आले व त्यानुसार संबंधितांवर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (२१-०६-२०१७)** :(१), (२) व (३) बृहन्मुंबई महानगरपालिकेच्या मलनि:सारण प्रचालने खात्यामार्फत पार पाडलेल्या मुंबई शहर, पूर्व उपनगरे आणि पश्चिम उपनगरातील दुरुस्ती (remedial) आणि सी.डब्ल्यू.सी. कामांच्या सन २००५ ते २००९ या कालावधीतील थकीत देयकांच्या अधिदानासंदर्भात झालेल्या तथाकथित घोटाळयाबाबत करण्यात आलेल्या प्राथमिक चौकशीत दोषी आढळलेल्या विविध विभागातील १२ अभियंत्यांवर दिनांक २१.१२.२०१२ रोजी आरोपपत्र बजावून त्यांची महानगरपालिकेचे उपायुक्त (दक्षता) यांचेमार्फत चौकशी करण्यात आली.

(४) सदर चौकशीत दोषी आढळलेल्या अभियंत्यांवर व फसवणुकीकरिता जबाबदार आढळलेल्या १७ कंत्राटदारांवर महानगरपालिकेमार्फत पुढीलप्रमाणे कारवाई करण्यात आली आहे:-

• ३ तत्कालीन अभियंता व २ सहाय्यक अभियंता यांना वेतनवाढ रोखणे व रोख रक्कमेचा दंड या शिक्षा करण्यात आल्या.

• ५ अभियंते सेवानिवृत्त झालेले असल्याने त्यांच्या दोषांबाबत मुंबई महानगरपालिका निवृत्ती वेतन नियम १९५३ (सुधारीत) मधील नियम क्र. १४(अ) व १४(ब) मधील तरतुदीनुसार शिक्षा देता आली नाही.

• २ अभियंत्यांना प्राथमिक चौकशीनंतर दोषमुक्त करण्यात आले आहे.

• ९ कंत्राटदारांना दि. १६.०३.२०१३ पासून अनोंदणीकृत करण्यात आले आहे.

• ४ कंत्राटदारांना लाचलुचपत प्रतिबंधक खात्याकडे प्रलंबित प्रकरणाच्या निकालापर्यंत दि.१६.०३.२०१३ पासून बहिष्कृत (debarred) करण्यात आले आहे.

• उर्वरित ४ कंत्राटदारांची देय रक्कम जप्त करण्यात आली आहे.

(५) प्रश्न उद्भवत नाही.

---

**भांडूप (प) येथील अरुंद रस्ते रुंदीकरण करण्याबाबत**

**(२०) ७०८०१ (१६-०१-२०१७). श्री.अशोक पाटील (भांडूप पश्चिम) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) भांडूप विधानसभा मतदार संघातील १० लाखाहून अधिक लोकसंख्या, वाहनांची व पादचाऱ्यांची वर्दळ यामुळे मतदार संघातील जंगल-मंगलरोड (पूर्वीचा खोतरोड), आर आर पेंटरोड व जनतामार्केट रोड हे अरुंद पडत आहेत, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर रस्त्याचे रुंदीकरण करण्याचा प्रस्तावावर मुंबई महानगरपालिकेच्या भांडूप विभागाच्या अतिरिक्त आयुक्त व सहायक आयुक्त यांच्यासोबत वांरवार बैठका घेऊनही निर्णयात्मक कार्यवाही झालेली नाही, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, या प्रकरणी स्थानिक लोकप्रतिनिधींनी मा.मुख्यमंत्री यांना दिनांक ०६ ऑगस्ट, २०१६ व आयुक्त, महानगरपालिका यांना दिनांक ०९ ऑगस्ट, २०१६ रोजी निवेदनाव्दारे प्रस्ताव दिल्यानंतरही आयुक्तांनी दिनांक २९ ऑगस्ट, २०१६ रोजी घेतलेल्या बैठकीतही झालेल्या निर्णयाच्या अनुषंगाने रस्ता रुंदीकरणाच्या कामाबाबत कोणतीच कार्यवाही सुरु केलेली नाही, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, त्याची कारणे काय आहेत व सदर रस्ता रुंदीकरणाचे काम किती कालावधीत पूर्ण करण्यात येणार आहे ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (२१-०६-२०१७) :**(१) हे खरे आहे.

(२), (३) व (४) जंगल-मंगल रोड, आर. आर. पेंट रोड व जनता मार्केट रोड या रस्त्यांचे रुंदीकरण करण्याच्या प्रस्तावावर महानगरपालिकेमार्फत पुढीलप्रमाणे कार्यवाही करण्यात येत आहे:-

<u>जंगल-मंगल रोड</u>

• या रस्त्यास ७८’ मंजुर मार्गरेषा असून, सदर रस्ता भट्टीपाडा, खोत रोड जंक्शन येथे अरुंद आहे.

• सदर रस्त्याच्या रुंदीकरणात मंजुर मार्गरेषानुसार ०८ रहिवाशी व ३५ अनिवासी असे एकूण ४३ बांधकामे बाधीत आहेत.

• सदर रस्त्यावरील वाहतुक कोंडी टाळण्यासाठी प्रथम टप्प्यात रस्ता १० मी. रुंद करण्याचे प्रस्तावित असून, त्यात एकूण ११ बांधकामे बाधीत आहेत.

• सदर ११ बांधकामांची पात्रता निश्चित करण्यात येत आहे.

<u>आर.आर.पेंट रोड</u>

• या ठिकाणी रस्ता मंजूर मार्गारेषेनुसार रुंदीकरणात एकूण ६ बांधकामे बाधीत होत होती.

• सदर बांधकामे निष्कासित करुन व पात्र बांधकामांना पर्यायी जागा देऊन रस्ता रुंदीकरण करण्यात आले आहे.

• तसेच, सदर ठिकाणी पर्जन्य जलवाहिनी व रस्ता बनविण्याचे काम सुरु आहे.

<u>जनता मार्केट रोड</u>

• सदर रस्त्यास १८.३० मी. मंजूर मार्गरेषा असून, रस्ता रुंदीकरणात ३७ रहिवाशी तसेच ५५ अनिवासी अशी एकूण ९२ बांधकामे बाधीत आहेत.

• सदर ठिकाणी एस.आर.ए. प्राधिकरणामार्फत जनता मार्केट व जनतेश्वर को.ऑप.सहकारी गृहनिर्माण संस्था यांच्या पुनर्विकासासाठी दिनांक ०३.०६.२०१६ रोजी एल.ओ.आय. जारी करण्यात आले आहे.

• सदर सोसायटी / विकासकाने दिनांक २३.११.२०१६ रोजीच्या पत्रान्वये, सदर रस्त्यावरील बाधीत बांधकामधारकांना स्वखर्चाने स्थलांतरीत करण्यात येऊन रस्त्याचा बाधीत भाग मोकळा करण्यात येईल असे कळविले आहे.

• तसेच, सदर प्रस्तावित रुंदीकरणात एकूण १२ झाडे बाधीत असून, सदर झाडे तोडण्यासाठी / स्थलांतरीत करण्यासाठी वृक्ष प्राधिकरणास प्रस्ताव सादर करण्यात आला आहे.

---

**सावली (जि.चंद्रपूर) येथील पाणी पुरवठा योजनेस नगरोत्थन योजनेमधून मंजूरी मिळण्याबाबत**

**(२१) ७१०३३ (१६-०१-२०१७). श्री.विजय वडेट्टीवार (ब्रम्हपूरी), श्री.सुनिल केदार (सावनेर), श्री.अमर काळे (आर्वी), श्री.अस्लम शेख (मालाड पश्चिम), डॉ.संतोष टारफे (कळमनुरी) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) सावली (जि.चंद्रपूर) येथील पाणी पुरवठा योजना सन १९८९ ची असून कालबाह्य झालेली असल्यामुळे वारंवार बंद पडून नागरिकांना पिण्याच्या पाण्यापासून वंचित राहावे लागत आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, नागरिकांना किमान दरडोई ४० लिटर पाणी उपलब्ध होण्याकरीता सावली नगरपंचायतीने महाराष्ट्र जीवन प्राधिकरणामार्फत १२ कोटी ८० लक्ष रुपयांच्या अंदाजपत्रकासह प्रस्ताव तयार करुन नगरोत्थान योजनेअंतर्गत मंजूरी मिळण्याकरीता दिनांक २४ ऑक्टोबर, २०१६ रोजी आयुक्त तथा संचालक, नगरपालिका प्रशासन, वरळी, मुंबई यांच्याकडे पाठविण्यात आला आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, सदर प्रस्तावास नगरोत्थान योजनेतंर्गत तातडीने मंजूरी मिळण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (२२-०६-२०१७) :**(१) होय.

(२), (३) व (४) महाराष्ट्र सुवर्ण जयंती नगरोत्थान महाभियानाच्या सुधारीत स्थायी आदेशानुसार सदर पाणी पुरवठा योजनेस महाराष्ट्र जीवन प्राधिकरणाकडून पुर्व तांत्रिक मान्यता घेऊन प्रस्ताव नगरपरिषद प्रशासन संचालनालयामार्फत शासनास सादर करणे आवश्यक आहे. त्याअनुषंगाने सावली नगरपंचायतीमार्फत सदर प्रकल्पास पूर्व तांत्रिक मान्यता घेऊन प्रस्ताव सादर करणे अपेक्षित आहे.

---

**मुंबईमधील बड्या उत्पादक कंपन्यांवर कारवाई करण्याबाबत**

**(२२) ७१५०१ (१६-०१-२०१७). श्री.शिरीषदादा चौधरी (अमळनेर), श्री.गणपत गायकवाड (कल्याण पूर्व) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मुंबईमध्ये गणेशोत्सव आणि नवरात्रौत्सवाच्या दरम्यान बड्या उत्पादक कंपन्या बेकायदेशीर होंर्डीग्जद्वारे जाहिरात करीत असल्याने त्यांच्यावर महाराष्ट्र प्रिव्हेशन ऑफ डिफेसमेंट ऑफ प्रॉपर्टी ॲक्ट अंतर्गत गुन्हे नोंदवुन कारवाई करण्याचे आदेश मा.न्यायालयाने दिल्याचे दिनांक १७ ऑक्टोबर, २०१६ वा त्यासुमारास निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाकडून सदर कंपन्यावर कोणती कारवाई करण्यात आली वा येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (२१-०६-२०१७) :**(१), (२) व (३) मा.उच्च न्यायालयात दाखल जनहित याचिका क्रमांक ३७/२०१० व १५५/२०११ मध्ये मा.न्यायालयाने, विनापरवाना बॅनर्स, पोस्टर्स आढळून आल्यास निष्कासनाची कारवाई करुन महाराष्ट्र प्रिव्हेन्शन ऑफ डिफेसमेंट ऑफ प्रॉपर्टी ॲक्ट अंतर्गत गुन्हे दाखल करण्याचे आदेश वेळोवेळी पारित केले असून, दिनांक ३१.०१.२०१७ रोजी अंतिम आदेश दिले आहेत.

मा. न्यायालयाच्या आदेशानुसार बेकायदेशीर होर्डीग्जद्वारे जाहिरात करीत असलेल्या कंपन्यांवर महानगरपालिकेमार्फत कारवाई करण्यात येत आहे.

---

**नांदेड शहरातील स्वच्छतेचे काम करणारी एटुझेड कंपनी कामात अनियमिता करित असल्याबाबत**

**(२३) ७२१५७ (१३-०२-२०१७). डॉ.तुषार राठोड (मुखेड) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) नांदेड वाघाळा महानगरपालिकेचा सन २०१६ मध्ये शहर स्वच्छता ठेका घेणारी एटुझेड कंपनी कराराप्रमाणे कामे न करता अनियमितता करीत असल्याने महानगरपालिकेने कंपनीस ब्लॅक लिस्टमध्ये टाकून कंपनीचे कंत्राट काढून घेतले असूनही हीच कंपनी शहर स्वच्छतेचे काम करीत असून अनियमितता व गैरव्यवहार करीत असल्याचे निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त प्रकरणी महानगरपालिकेने कंपनीचा करार संपुष्टात आल्यावरही याच कंपनीस शहर स्वच्छतेची कामे दिली व कंपनीच्या अनियमिततेकडे दुर्लक्ष करून गैरव्यवहारास मदत केली, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी करुन दोषींवर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (२२-०६-२०१७)** :(१) हे खरे नाही.

(२) व (३) नांदेड वाघाळा शहर महानगरपालिका हद्दीतील कचरा गोळा करणे, रस्ते साफसफाई व नाले सफाई या कामाचे कंत्राट दि.०१/०४/२०१२ पासून तीन वर्षाच्या कालावधीकरिता ए टू झेड इन्फ्रास्टक्चर लि.गुरगांव (हरीयाणा) यांना दिलेले होते.सदर कंत्राटदाराची मुदत ३१/०३/२०१५ रोजी संपल्यामुळे नवीन निवीदा प्रक्रिया हाती घेण्यात आलेली होती.तथापी योग्य प्रतीसाद न मिळाल्यामुळे स्थायी समितीच्या मान्यतेने दि.०१/०४/२०१५ ते दि.२१/०३/२०१७ या कालीवधीकरिता संबंधित कंत्राटदारास मुदतवाढ देण्यात आलेली होती.

लोकप्रतिनिधी तसेच नागरिकांकडुन सदर कंपनीच्या असमाधानकारक कामाबाबतच्या तक्रारीच्या अनुषंगाने अटी व शर्तीनुसार संबंधित कंत्राटदारावर दंडात्मक कारवाई करण्यात आलेली असुन एप्रिल २०१२ ते मार्च २०१७ या कालावधीत एकुण रु.८७,१७,५८९/- इतका दंड वसूल करण्यात आलेला आहे.

सद्यस्थितीत स्थायी समितीने सन्मत केलेल्या ठरावानुसार मनपा कर्मचारी, कंत्राटी वाहने व कामगाराच्या वतीने शहरातील साफसफाईची कामे करुन घेण्यात येत आहेत.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

## उस्मानाबाद जिल्हयामधील माजी सैनिकांना सेवा पुरविणेबाबत

**(२४) ७२२६३ (१३-०२-२०१७). श्री.ज्ञानराज चौगुले (उमरगा) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) उस्मानाबाद जिल्हयामध्ये माजी सैनिक/विधवा/युध्द विधवा आदींची सुमारे चार ते साडेचार हजार कुटूंबे वास्तव्यास असून यावर अवलंबितांची संख्या सुमारे १५,००० इतकी आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उस्मानाबाद जिल्हयाच्या ठिकाणी त्यांच्यासाठी सी.एस.डी. कॅण्टीन, माजी सैनिक अंशदायी स्वास्थ्य योजना, मुलींचे वसतीगृह आदींसाठी केंद्र व महाराष्ट्र शासनाकडून मंजुरी आली असुनही पुरेशी जागा उपलबध नसल्यामुळे उपरोक्त कुटूंबांना सदरच्या सेवा पुरविणे अशक्य झाले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उक्त प्रकरणी मौजे उस्मानाबाद (ता.जि.उस्मानाबाद) येथील सर्व्हे नं.८ मधील क्षेत्र १ हे ६२ आर एवढी जागा मा.राज्यपाल यांच्या नावे जिल्हा सैनिक कल्याण कार्यालय, उस्मानाबाद यांस हस्तांतरण करणेबाबत उमरगा-लोहारा येथील लोकप्रतिनिधींनी दिनांक १६ मार्च, २०१६ रोजी वा त्यासुमारास लेखी निवेदनाद्वारे विनंती केली होती, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, उक्त निवेदनाच्या अनुषंगाने कोणतीही कार्यवाही करण्यात आली नाही, हे ही खरे आहे काय,

(५) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(६) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. संभाजी पाटील-निलंगेकर (१३-०४-२०१७)** :(१) होय.

(२) माजी सैनिकांच्या कल्याणासाठी सी.एस.डी.कॅण्टीन, सुविधा देणेबाबत स्टेशन मुख्यालय अहमदनगर यांनी सी.एस.डी. कॅण्टीन चालविणेबाबत असमर्थता दर्शविली आहे. तथापि याबाबत फेर प्रस्ताव पाठवून विनंती करण्यात आलेली आहे.

माजी सैनिक अंशदायी स्वास्थ योजनेसाठी नगरपालिका उस्मानाबाद यांचे अखत्यारितील इमारत कराराने घेऊन ही सुविधा माजी सैनिक/विधवा व अवलंबितांना देण्यात येत आहे.

(३) होय.

(४) सैनिकी मुलींच्या वसतीगृहासाठी उस्मानाबाद येथील सर्वे नं. ८ मधील १ हेक्टर ६२ आर जागा देणेबाबत लोकप्रतिनिधींच्या शिष्टमंडळाने मार्च, २०१६ मध्ये तात्कालीन महसूल मंत्री यांच्याकडे पाठविण्यात आला होता. परंतु जागा मिळणेबाबतचा मुळ प्रस्ताव मंत्रालयात लागलेल्या आगीमध्ये नष्ट झाल्यामुळे नविन प्रस्ताव सादर करण्यात आला आहे.

(५) मा.जिल्हाधिकारी, तहसिलदार उस्मानाबाद, मुख्याधिकारी नगरपरिषद व जिल्हा सैनिक कल्याण अधिकारी यांची बैठक आयोजित करण्यात आली होती. सदर बैठकीत माजी सैनिक अंशदायी स्वास्थ योजनेच्या जागेकरीता वेगळा प्रस्ताव व जिल्हा सैनिक कल्याण अधिकारी यांना मुलींच्या वसतीगृह, माजी सैनिक विश्रामगृह, सी.एस.डी. कॅण्टीन व भरतीपूर्व प्रशिक्षण केंद्र चालविणेसाठी (सैनिक संकुल) जागेकरीता वेगळा प्रस्ताव सादर करणेबाबत सुचित केले आहे.

(६) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

### पुणे महानगरपालिकेच्या मालकीच्या मिळकतीचे भाडे वसूल होत नसल्याबाबत

**(२५) ७२७७१ (१३-०२-२०१७). श्री.योगेश टिळेकर (हडपसर) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) पुणे महानगरपालिकेच्या मालकीच्या भाडोत्री दिलेल्या मिळकतीचे भाडे वसूल करू न शकलेल्या महापालिकेला सदर मिळकतींवर झालेल्या अतिक्रमणाची माहितीही उपलब्ध नसल्याचे माहे सप्टेंबर, २०१६ च्या तिसऱ्या आठवड्यात निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, महापालिकेला अतिक्रमणाबाबतची माहिती नसल्याने अतिक्रमणाविरुध्द कारवाई वारंवार पुढे ढकलली जात आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उक्त प्रकरणी शासनामार्फत चौकशी करून कोणती कार्यवाही करण्यात आली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (२८-०६-२०१७)** :(१), (२) व (३) पुणे महानगरपालिकेच्या मालकीच्या भाडेपट्टयाने दिलेल्या मिळकतीची नियमितपणे जागा पाहणी करुन अतिक्रमण झाल्याचे निदर्शनास आल्यास अतिक्रमण काढण्याविषयी कारवाई वेळोवेळी करण्यात येते. तसेच महानगरपालिका जागेवरील अतिक्रमणाबाबत प्राप्त झालेल्या तक्रारींच्या अनुषंगानेदेखील नियमितपणे कारवाई करण्यात येते.

अतिक्रमण काढण्यासाठी महानगरपालिकेच्या विविध संबंधित खात्याच्या मदतीने व स्थानिक पोलीस बंदोबस्त घेऊन अतिक्रमण काढण्याची कारवाई नियमित करण्यात येते.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

## मुंबईत महिलांसाठी मोफत शौचालये उपलब्ध करून देण्याबाबत

**(२६) ७३८१२ (२०-०४-२०१७). अॅड.आशिष शेलार (वांद्रे पश्चिम) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मुंबईत महिलांसाठी मोफत सार्वजनिक शौचालयांच्या मागणीसाठी ३२ समाजिक संस्थांनी सुरु केलेल्या राइट टू पी या मोहिमेला साडेपाच वर्षापेक्षा अधिक कालावधी नंतरही मुंबई महानगरपालिकेने योग्य कार्यवाही केली नसल्याचे माहे जानेवारी, २०१७ मध्ये निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, मंबई शहरात शौचालय संस्थाचालकांमार्फत नियमांचे पालन करत नसून दोन हजारांहून अधिक सार्वजनिक शौचालायामध्ये महिलांसाठी मोफत सुविधा विनामुल्य दिली जात नाही, हे खरे आहे काय,

(३) असल्यास, सदर प्रकरणी कोणती कारवाई करण्यात आली वा येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (२१-०६-२०१७) :**(१), (२), (३) व (४) सदर संस्थेच्या प्रतिनिधींसोबत वारंवार झालेल्या बैठकीच्या अनुषंगाने त्यांनी सुचविल्याप्रमाणे, महानगरपालिकेद्वारे सध्या अस्तित्वात असलेली शौचालये व आवश्यकतेनुसार बांधण्यात येणाऱ्या प्रत्येक शौचालयामध्ये महिलांसाठी मुतारीची व्यवस्था विनामुल्य करणे अनिवार्य करण्यात आले आहे. तसेच, याबाबत महानगरपालिकेमार्फत परिपत्रक निर्गमित करुन विभाग कार्यालयाद्वारे सर्व संबंधित प्रचालक संस्थांना सूचना देण्यात आल्या आहेत.

बृहन्मुंबई महानगरपालिका परिक्षेत्रात सध्या “पैसे द्या व वापरा” या तत्वावरील स्वच्छतागृहांमध्ये पुरुष व महिलांसाठी एकूण १०,९१९ शौचकुपे उपलब्ध करण्यात आलेली आहेत, त्यापैकी महिलांकरिता ३७९२ एवढी शौचकुपे आहेत. सदर स्वच्छतागृहांमध्ये महिलांकरिता शौचकुपे / मुतारीची वेगळी व्यवस्था आहे व मुतारीची सुविधा मोफत आहे.

तसेच, सदर शौचालयांमध्ये दैनंदिन परिरक्षण व स्वच्छता राखण्याकरिता २४ विभागांमध्ये कनिष्ठ अवेक्षकांची नियुक्ती करण्यात आलेली आहे. सदर कनिष्ठ अवेक्षकामार्फत शौचालयांचे संनियंत्रणाचे काम पाहिले जाते.

मुंबई शहर विकास आराखडा सन २०३४ मध्ये नव्याने अनेक विभागांमध्ये शौचालयाकरिता मोकळया जागा आरक्षित करण्यात आलेल्या असून, त्यांच्या बांधकामासाठी सन २०१७-१८ मध्ये रु. २.८८ कोटीची तरतूद करण्यात आली आहे.

---

**मुंबई महानगरपालिकेच्या लीजवरील भूखंडाचे नुतणीकरण वा भूखंड ताब्यात घेण्याबाबत**

**(२७) ७४१९९ (२०-०४-२०१७). श्री.जयंत पाटील (इस्लामपूर), श्री.शशिकांत शिंदे (कोरेगाव), श्री.मकरंद जाधव-पाटील (वाई), डॉ.सतीश (अण्णासाहेब) पाटील (एरंडोल), श्री.हसन मुश्रीफ (कागल), श्री.सुनिल शिंदे (वरळी), श्री.राजन साळवी (राजापूर), श्री.अस्लम शेख (मालाड पश्चिम), श्री.शामराव ऊर्फ बाळासाहेब पाटील (कराड उत्तर), श्री.पांडुरंग बरोरा (शहापूर), श्री.राहुल मोटे (परांडा), श्री.राणाजगजीतसिंह पाटील (उस्मानाबाद), श्री.वैभव पिचड (अकोले), श्री.राहुल जगताप (श्रीगोंदा) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मुंबई महानगरपालिकेच्या मालकीच्या ४१७७ मालमत्ता असून त्यापैकी २३६ भूखंडाचा लिजकरार संपून २ ते ३ वर्षाचा कालावधी होवूनही नूतणीकरण न करता त्या मालमत्तांवर उद्योग सुरु आहेत, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त प्रकरणी शासनामार्फत चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले व तदनुसार सदर लीजवरील मालमत्ता कराचे नुतणीकरण वा ताबा घेणेबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (२०-०६-२०१७) :**(१), (२) व (३) महानगरपालिकेने मक्त्याने दिलेल्या ४१७७ मालमत्तांपैकी २५५ मालमत्तांची मुदत संपुष्टात आलेली आहे.

मक्ता संपुष्टात आलेल्या २५५ मालमत्तांपैकी १०३ मालमत्ता अनुसूची 'डब्ल्यु' अंतर्गत राज्य शासनाच्या मालकीच्या आहेत. तसेच, अनुसूची 'व्ही' अंतर्गत १७ मालमत्ता पोलीस विभागास मक्त्याने देण्यात आल्या आहेत व महापालिकेच्या १३५ मालमत्ता आहेत.

- मा.मंत्रीमंडळाने घेतलेल्या निर्णयानुसार, मक्ता नुतनीकरणाची कार्यवाही करण्याबाबत दिनांक १५ मार्च, २०१७ च्या शासन निर्णयान्वये बृहन्मुंबई महानगरपालिकेस निदेश देण्यात आले आहेत.
- मक्ता संपुष्टात आलेल्या महानगरपालिकेच्या मालकीच्या मालमत्तांच्या मक्ता नुतनीकरणाबाबत महानगरपालिकेने सन २००१-२००२ मध्ये निश्चित केलेल्या धोरणानुसार मक्ता नुतनीकरणाची कार्यवाही करण्यात येते.
- तथापि, अनधिकृत बांधकामे करण्यात आलेल्या तसेच, मक्ता अटी व शर्तीचा भंग झालेल्या महानगरपालिकेच्या मालमत्तांच्या मक्त्याचे नुतनीकरण करण्याबाबत धोरण निश्चित करण्यात येत असून, त्यानुसार मक्ता कालावधी संपुष्टात आलेल्या महानगरपालिकेच्या मालकीच्या १३५ भुभागांचे मक्ता नुतनीकरण करण्यात येणार आहे.
- तसेच, अनुसुची 'व्ही' मधील १७ भुभागांच्या मक्ता नुतनीकरणाबाबत पुढील कार्यवाही सुरु आहे.

---

**कल्याण-डोंबिवली पालिका हद्दीतील टिटवाळा मांडा येथील रस्त्यांची दुरवस्था झाली असल्याबाबत**

**(२८) ७४२६६ (२१-०४-२०१७). श्री.नरेंद्र पवार (कल्याण पश्चिम), ॲड.पराग अळवणी (विलेपार्ले), ॲड.आशिष शेलार (वांद्रे पश्चिम) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) कल्याण-डोंबिवली पालिका हद्दीतील टिटवाळा मांडा येथील रस्त्यांची दुरवस्था झाली असून खड्डयामुळे सतत अपघात होत असल्याचे निदर्शनात आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, या प्रकरणाची चौकशी करण्याचे आदेश कल्याण डोंबिवली पालिकेने संबंधितांना दिले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, प्रशासनाकडून कोणती उपाययोजना केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (२१-०६-२०१७) :**(१) अंशतः खरे आहे.

कल्याण-डोंबिवली महानगरपालिका हद्दीतील टिटवाळा मांडा येथील रस्त्यांची दुरवस्था झाल्याची बाब खरी आहे. परंतु सदर रस्त्यांवर अपघात होण्यासारखी परिस्थिती नाही.

(२) हे खरे नाही.

(३) मांडा-टिटवाळा परिसरातील ५ रस्त्यांचे रुंदीकरण, सिमेंटीकरण, डांबरीकरण व मजबूतीकरणाची कामे महानगरपालिकेमार्फत हाती घेण्यात आली असून सदर कामे अंतिम टप्प्यात व प्रगतीपथावर आहेत.

तसेच, महानगरपालिकेच्या ‘अ’ प्रभाग क्षेत्रांतर्गत रस्त्यांवरील खड्डे दुरुस्तीसाठी सन २०१७-१८ या आर्थिक वर्षाकरीता रु.१३४.९९ लक्ष इतक्या रकमेचे प्राकलन मंजूर झाले असून त्याकरीताची निविदा प्रक्रिया महानगरपालिकेमार्फत सुरु आहे.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

**कल्याण-डोंबिवली (जि.ठाणे) महापालिकेच्या मालमत्ता कराच्या वसुलीतील गैरव्यहार**

**(२९) ७४२६७ (२०-०४-२०१७). श्री.नरेंद्र पवार (कल्याण पश्चिम), ॲड.पराग अळवणी (विलेपार्ले), ॲड.आशिष शेलार (वांद्रे पश्चिम) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) कल्याण-डोंबिवली महापालिकेच्या (जि.ठाणे) मालमत्ता कराच्या वसुलीतील गैरव्यवहार टिटवाळा येथील रेसिडन्सी गृहनिर्माण व रविंद्र आर्केड या सोसायट्यांच्या निदर्शनास आल्याचे नुकतेच समोर आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, या प्रकरणाची चौकशी करण्याचे आदेश कल्याण-डोंबिवली पालिका आयुक्त यांनी संबंधितांना दिले आहेत, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, चौकशीत काय आढळून आले व त्यानुसार पुढे कोणती कारवाई करण्यात आली वा येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (२१-०६-२०१७)** :(१) हे खरे नाही.

रेसिडन्सी गृहनिर्माण या नावाची कोणतीही इमारत कल्याण-डोंबिवली महानगरपालिकेच्या दप्तरी आढळून येत नाही.

(२) हे खरे नाही.

तथापि, रविंद्र रिजेन्सी या मिळकतीमधील करदात्यांनी जमा केलेल्या रकमांबाबत चौकशी करण्याचे निर्देश आयुक्त, कल्याण-डोंबिवली महानगरपालिका यांनी संबंधितांना दिले आहेत.

(३) आयुक्त, कल्याण-डोंबिवली महानगरपालिका यांनी दिलेल्या निर्देशानुसार प्रस्तुत प्रकरणाची चौकशी केली असता, रविंद्र रिजेन्सी मधील २ सदनिकादारांनी चुकून रविंद्र आर्केड या मिळकतीवर कराचा भरणा केला असल्याचे निदर्शनास आले.

रविंद्र रिजेन्सी मधील ज्या सदनिकादारांनी त्यांच्या स्वतःच्या मिळकती ऐवजी अन्य मिळकतीवर रक्कम भरणा केल्याची खातरजमा झाली आहे. महानगरपालिकेने तेवढी रक्कम सन २०१७-१८ या आर्थिक वर्षाच्या मालमत्ता कराच्या बिलात समायोजित केली आहे.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

**कल्याण डोंबिवली (जि.ठाणे) महापालिकेतून २७ गावे वगळण्याबाबत**

**(३०) ७४५८१ (२०-०४-२०१७). श्री.नरेंद्र पवार (कल्याण पश्चिम), ॲड.पराग अळवणी (विलेपार्ले), ॲड.आशिष शेलार (वांद्रे पश्चिम) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) कल्याण-डोंबिवली महापालिकेतून (जि.ठाणे) २७ गावे वगळण्याचे आश्वासन देऊनही शासनाने ते पाळले नाही व पालिकेने रस्ते रुंदीकरणाची मोहीम हाती घेतली असून कल्याण शिळ मार्गालगतची बांधकामे पालिकेने तोडली आहेत असे निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, २७ गावे महापालिकेतून वगळली असल्याची प्राथमिक सूचना दिनांक ७ सप्टेंबर, २०१५ ला शासनाने काढली असून त्यावेळी कोकण विभागीय आयुक्तांनी नागरिकांच्या हरकती व सूचनांचा अहवाल शासनाकडे सादर करण्यास विलंब केला त्यामुळे शासनाने महापालिका निवडणुका पार पडल्यावरही २७ गावे वगळण्याचा निर्णय घेतलेला नाही, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, महापालिकेतून गावे वगळण्याचा निर्णय शासनाच्या विचारधीन असतांना कल्याण शिळ रोडवर टाटा पावर नाक्यापासून लोढा निळजे पर्यंत पोलीस बंदोबस्त तोडले असता बाधितांचे सर्वेक्षण करूनही मुल्यांकन केले नाही, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, शासनाच्या पुनर्वसन कायद्यानुसार रेडी रेकनरच्या चारपट मोबदलाही जाहीर केलेला नाही, हे ही खरे आहे काय,

(५) असल्यास, रस्ते रुंदीकरणाची मागणी ग्रामस्थांनी केलेली नाही तरीही बिल्डरांच्या हिताच्या प्रकल्पांसाठी रस्ते २४, ३० आणि ४५ मीटर रुंदीकरणाचे काम पालिकेने हाती घेतले आहे, हे ही खरे आहे काय,

(६) असल्यास, शासनाकडून याबाबत कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (२२-०६-२०१७) :**(१) महानगरपालिकेच्या विकास योजनेमध्ये कल्याण शिळ रस्त्यांची रुंदी ३०.०० मीटर प्रस्तावित असून त्यामधील बाधित बांधकामे महानगरपालिकेने माहे डिसेंबर, २०१६ मध्ये निष्कासीत केली आहेत, ही बाब खरी आहे.

कल्याण-डोंबिवली शहर महानगरपालिकेच्या क्षेत्रातून २७ गावे वगळून या गावांच्या क्षेत्राकरीता नगरपरिषद घटीत करण्याच्या दृष्टीने राज्य शासनाने प्राथमिक अधिसूचना प्रसिद्ध केली आहे. या प्राथमिक अधिसूचनेच्या अनुषंगाने प्राप्त होणाऱ्या हरकती व सूचनांस अनुसरुन अहवाल सादर करण्याबाबत विभागीय आयुक्त, कोकण विभाग यांना सूचित करण्यात आले आहे.

(२) हे खरे नाही.

विभागीय आयुक्त, कोकण विभाग यांच्याकडे नागरिकांकडून प्राप्त झालेल्या हरकती व सूचनांवर सुनावणी घेणे प्रस्तावित असून, याबाबतचा अहवाल प्राप्त होताच त्या अनुषंगाने साधक-बाधक विचार करुन यथोचित निर्णय घेता येईल.

(३) हे खरे नाही.

(४) अंशतः खरे आहे.

महानगरपालिकेची आर्थिक स्थिती लक्षात घेता, महानगरपालिका क्षेत्रातील विकास योजनेनुसार रस्त्यांकरीता जागांचे संपादन केल्यानंतर सदर जागेच्या मोबदल्यात जमीनमालक यांनी आवश्यक कागदपत्रांसह महानगरपालिकेकडे अर्ज/प्रस्ताव दाखल केल्यास शासनाच्या धोरणानुसार हस्तांतरणीय विकास हक्क प्रदान करण्याबाबतची आवश्यक कार्यवाही महानगरपालिकेकडून करण्यात येते.

(५) हे खरे नाही.

तथापि, महानगरपालिका क्षेत्रामध्ये भविष्यात वाढ होणाऱ्या रहदारीच्या दृष्टीकोनातून सदर रस्ता सद्यस्थितीत विकास योजनेतील प्रस्तावित रुंदीनुसार म्हणजेच ३०.०० मीटर रुंद करणे आवश्यक असल्याने त्यानुसार महानगरपालिकेकडून कार्यवाही सुरु आहे. परंतु सदर रस्ता ४५.०० मीटर रुंद करण्याचे अद्याप प्रस्तावित नाही.

(६) प्रश्न उद्भवत नाही.

---

**लालबाग उड्डाणपुलाचे स्ट्रक्चरल ऑडिट करण्याबाबत**

**(३१) ७४६१८ (२०-०४-२०१७). श्री.अमित विलासराव देशमुख (लातूर शहर), श्री.राधाकृष्ण विखे-पाटील (शिर्डी), श्री.संजय पोतनीस (कलिना), श्री.डि मल्लीकार्जून रेड्डी (रामटेक) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मुंबईतील लालबाग पुलाचे काम निकृष्ट दर्जाचे झाले असल्याने महापालिका आयुक्तांना उड्डाणपुलाचे स्ट्रक्चरल ऑडिट करण्याचे निर्देश न्यायालयाने दिले असल्याचे माहे जानेवारी, २०१७ मध्ये निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (२१-०६-२०१७) :**(१) लालबाग उड्डाणपुलाचे स्ट्रक्चरल ऑडीट करुन त्याचा अहवाल मा. उच्च न्यायालयास सादर करण्याच्या सूचना मा. उच्च न्यायालयाने बृहन्मुंबई महानगरपालिकेस दिल्या आहेत हे खरे आहे.

(२) व (३) स्ट्रक्चरल ऑडिटच्या अहवालानुसार महानगरपालिकेमार्फत सदर पुलाच्या किरकोळ दुरुस्तीची कामे हाती घेण्यात आली असून, अन्य दुरुस्तीची कामे करण्यासाठीची कार्यपध्दती ठरविण्याचे काम सुरु असून, महानगरपालिकेमार्फत याबाबतची पुढील कार्यवाही प्राधान्याने करण्यात येत आहे.

---

## नवी मुंबईतील तुर्भे व सानपाडा रेल्वे स्टेशनच्यामध्ये असलेल्या प्रसिद्ध जनता मार्केटकडे जाण्यासाठी स्कायवॉक बांधण्याबाबत

**(३२) ७४८३९ (२०-०४-२०१७). श्री.संदीप नाईक (ऐरोली), श्री.किसन कथोरे (मुरबाड) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) नवी मुंबईतील तुर्भे व सानपाडा रेल्वे स्टेशनच्यामध्ये असलेल्या प्रसिद्ध जनता मार्केटकडे जाण्यासाठी स्कायवॉक बांधण्याकरिता रेल्वे विभागाशी नवी मुंबई महापालिकेने करारनामा केला आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, केव्हा तसेच त्यासाठी रेल्वे विभागास भरावयाची रक्कम रु. ६,७४,६७,४५५ भरण्यात आली आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, सदर स्कायवॉकचे काम सुरु करण्याबाबत शासन स्तरावरून काय कार्यवाही करण्यात आली वा येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (२१-०६-२०१७) :**(१) होय, हे खरे आहे.

(२) नवी मुंबई महानगरपालिका क्षेत्रातील ठाणे-बेलापूर रस्त्यावर तुर्भेनाका ते जनता मार्केटपर्यंत रेल्वे क्रॉसिंगवर पादचारी पुल (FOB) बांधण्याचे काम रेल्वे प्रशासनामार्फत Deposit Term Basis वर करण्यात येणार असून, याबाबत नवी मुंबई महानगरपालिका व रेल्वे प्रशासन यांच्यामध्ये दि.११/०७/२०१६ रोजी सामंजस्य करार (MOU) झाला आहे.

तथापि, सदर रक्कम महानगरपालिकेने अद्याप रेल्वे प्रशासनाकडे भरणा केलेली नाही.

(३) व (४) महानगरपालिका व रेल्वे प्रशासन यांच्यातील करारनाम्यानुसार रेल्वे प्रशासनाकडे भरणा करावयाच्या रकमेकरीता सन २०१६-१७ च्या अर्थसंकल्पात पुरेशी तरतूद उपलब्ध नव्हती. त्यामुळे पादचारी पूल (Sky Walk) या लेखाशिर्षात पुनर्विनियोजनाने निधीची तरतूद करण्यात आली आहे.

रेल्वे प्रशासनाने जनता मार्केट, तुर्भे येथील पादचारी पुलाच्या अंदाजपत्रकात विद्युत व्यवस्था करण्यासंबंधीच्या कामासाठी रु.१०,०१,६४९/- इतक्या रकमेचा समावेश करुन सुधारीत रक्कम रु.६,८४,६९,१०४/- रेल्वे प्रशासनास अदा करण्याकरीता नवी मुंबई महानगरपालिकेला कळविले आहे.

त्यानुसार सदर रकमेस प्रशासकीय मंजुरी मिळण्याचा सुधारीत प्रस्ताव महानगरपालिकेच्या सर्वसाधारण सभेपुढे सादर करण्यात आला आहे. सदर प्रस्तावास सर्वसाधारण सभेची मंजूरी प्राप्त झाल्यानंतर उक्त रक्कम रेल्वे प्रशासनास अदा करण्याची महानगरपालिकेने तजवीज ठेवली आहे.

---

**मालेगांव (जि.नाशिक) येथील संस्थेने नेहरु रोजगार सेंटर शेल्टर अेको मोडेशन 'बल्ली पत्रा' या योजनेबाबत**

**(३३) ७४९७१ (२०-०४-२०१७). श्री.आसिफ शेख (मालेगांव मध्य) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मालेगांव (जि.नाशिक) येथे सन १९९१ ते १९९३ दरम्यान संस्थेने नेहरु रोजगार सेंटर शेल्टर अेको मोडेशन 'बल्ली पत्रा' या योजने अंतर्गत २५० लोकांना रक्कम ४००० प्रमाणे प्रति घर दिले, परंतू सदर कर्जाची रक्कम आजपर्यत व्याजामुळे वाढली असल्याने लाभार्थ्यांना ती रक्कम परत करणे अशक्य असल्याने सदरील योजनेवरील व्याज माफ करणेबाबतचे निवेदन स्थानिक लोकप्रतिनिधीनी मा.मुख्यमंत्र्यांना दिले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने काय कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (२३-०६-२०१७) :**(१) होय.

(२) सदर योजनेसाठी हुडको कडून रु.११७ लक्ष कर्ज व रु.३५ लक्ष अनुदान (केंद्र व राज्य शासनाकडून) तत्कालिन मालेगाव नगर परिषदेस प्राप्त झाले होते.

सदर रकमेपैकी १२५४ लाभार्थींना रु.३००० कर्ज व रु.१०००/- अनुदान याप्रमाणे वाटप करण्यात आलेले होते. त्यापैकी २१३ लाभार्थींनी संपुर्ण कर्जाची रक्कम व्याजासह फेड केलेली आहे.

उर्वरित १०४१ लाभार्थीकडे कर्ज रु.३२,०४,०००/- व कर्जावरील व्याजाची मिळून एकूण रु.३,८८,८२,०७७/- (दि.३१.३.२०१७ पर्यंत) येणे बाकी आहे.

सदर योजनेसाठी हुडको या संस्थेकडून प्राप्त संपूर्ण कर्जाची परतफेड महानगरपालिकेमार्फत करण्यात आली आहे.

तसेच महासभा ठराव क्र.१९४, दि.०७.०३.२०१७ अन्वये, लाभार्थ्यांकडून प्रत्येकी मुद्दल रु.३०००/- व व्याजाचे रु.३०००/- याप्रमाणे एकूण रु.६०००/- वसूल करुन उर्वरित व्याजाची रक्कम माफ करण्याबाबत ठराव पारित करण्यात आलेला आहे.

अशा प्रकारची व्याज माफीची तरतूद महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमात नाही. त्यामुळे महानगरपालिकेची आर्थिक परिस्थिती विचारात घेऊन, महानगरपालिकेने निर्णय घेणे अपेक्षित आहे. त्याप्रमाणे आयुक्त, मालेगाव महानगरपालिका यांना सूचित करण्यात आले आहे.

(३) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

**मुंबईत ४ लाख शाळाबाह्य मुले असल्याचे सर्वेक्षणातून आढळून आल्याबाबत**

**(३४) ७५१२० (२१-०४-२०१७). डॉ.भारती लव्हेकर (वर्सोवा), श्रीमती मनिषा चौधरी (दहिसर), प्रा.वर्षा गायकवाड (धारावी), ॲड.पराग अळवणी (विलेपार्ले), श्री.नरेंद्र पवार (कल्याण पश्चिम), श्री.राजु तोडसाम (अर्णी), श्री.अमित साटम (अंधेरी पश्चिम), श्री.संजय केळकर (ठाणे), ॲड.गौतम चाबुकस्वार (पिंपरी), श्री.राजेंद्र नजरधने (उमरखेड) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मुंबई महानगरपालिकेने शहरात केलेल्या सर्वेक्षणात केवळ ४९० शाळाबाहय मुले असल्याचे माहे जानेवारी, २०१७ च्या सुमारास निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, गेल्यावर्षी केलेल्या सर्वेक्षणात २ हजार ९२७ शाळाबाहय मुले आढळून आली होती, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, राज्यात ४ लाख शाळाबाहय मुले असतांना मुंबई शहरामध्ये फक्त ४९० शाळाबाहय मुले आहेत, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, याबाबत शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीअंती शाळाबाहय प्रत्येक मुला-मुलींना शाळांमध्ये प्रवेश देणेबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (२१-०६-२०१७) :**(१) हे खरे आहे.

(२) हे खरे आहे.

(३) व (४) मुंबई शहरातील शाळाबाह्य तसेच शाळेतून गळती झालेल्या ६ ते १४ वयोगटातील बालकांचे सर्वेक्षण करुन आढळलेल्या ४९० शाळाबाहय मुलांना महानगरपालिकेमार्फत शाळेच्या मुख्य प्रवाहात दाखल करुन घेण्यात आले आहे.

(५) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

**मुंबई महानगरपालिकेची जकात निरसीत झाल्यामुळे होणा-या महसूल हानीची प्रतिपूर्ती करण्याबाबत**

**(३५) ७५४७३ (२१-०४-२०१७). श्रीमती तृप्ती सावंत (वांद्रे पूर्व), श्री.सुनिल शिंदे (वरळी), श्री.अजय चौधरी (शिवडी), श्री.राजन साळवी (राजापूर) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मुंबई महानगरपालिकेची जीएसटी लागू करतांना जकात निरसीत झाल्यामुळे होणा-या महसूल हानीची प्रतिपूर्ती केंद्र शासनामार्फत शासन करणार आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, आतापर्यंत केंद्र शासनाकडून शासनास किती रक्कम प्राप्त झाली आहे व सदर रक्कम शासनाने मुंबई महानगरपालिकेला दिली आहे काय,
(३) असल्यास, केंद्र शासनाकडून महसूल हानीच्या प्रतिपूर्तीकरता मुंबई महानगरपालिकेस मिळणारी रक्कम शासनास प्राप्त झाली आहे काय,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (२३-०६-२०१७) :**(१) होय.
(२) व (३) अद्याप वस्तू व सेवा कर अधिनियम (GST) लागू झालेला नाही. त्यामुळे केंद्र शासनाकडून याबाबत हानींची प्रतिपूर्ती होण्याचा प्रश्न उद्भवत नाही.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

**महालक्ष्मी (मुंबई) येथे विजेच्या तारेला अडकलेल्या पक्षाला काढताना जखमी झालेले अग्निशमन दलाचे जवानाचा झालेला मृत्यू**

**(३६) ७६६१० (२०-०४-२०१७). श्री.योगेश सागर (चारकोप) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) महालक्ष्मी (मुंबई) येथे विजेच्या तारेला अडकलेल्या पक्षाला काढताना जखमी झालेले अग्निशमन दलाचे जवान श्री.राजेंद्र भोजने (वय ३५ वर्ष) यांचा मृत्यू झाला, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, श्री.भोजने यांच्या पत्नीस नोकरी देणे तसेच त्यांची मृत्यू पश्चात देणी लवकर द्यावे अशी त्यांच्या कुटुंबियांची मागणी होती, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, सदर प्रकरणी शासनाने कोणती उपाययोजना केली वा करण्यात येणार आहे,
(४) नसल्यास, विलंबाचे कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (२२-०६-२०१७) :**(१) हे खरे आहे.
(२), (३) व (४) श्री. भोजने यांच्या मृत्युपश्चात त्यांच्या कुटुंबियांस नुकसान भरपाई, तातडीची मदत म्हणून रु. १५,९१,७५०/- इतक्या रकमेचे अधिदान करण्यात आले आहे.
तसेच, दिवंगत भोजने यांचे पत्नीस नोकरी देणेबाबत महानगरपालिका प्रशासनामार्फत कार्यवाही करण्यात येत आहे.

---

**मुंबईतील भिक्षेकरी मुलांसाठी सिग्नल शाळा सुरु करण्याबाबत**

**(३७) ७६६२८ (२१-०४-२०१७). श्री.राहुल जगताप (श्रीगोंदा), श्री.पांडुरंग बरोरा (शहापूर), श्री.राहुल मोटे (परांडा), श्री.वैभव पिचड (अकोले), श्री.संदीप नाईक (ऐरोली), श्री.राणाजगजीतसिंह पाटील (उस्मानाबाद) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मुंबईतील भिक्षेकरी मुलांसाठी सिग्नल शाळा सुरु करण्याची बाब शासनाच्या विचाराधीन आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, सदर विचाराधीन बाबीवरील शासनाचा निर्णय पूर्ण झाला आहे काय,
(३) असल्यास, त्यानुसार शासनाने आतापर्यंत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (२१-०६-२०१७)** :(१) मुंबईतील भिक्षकरी मुलांसाठी सर्व विद्यार्थ्यांना प्रत्येक सिग्नलपासून १ कि.मी. च्या आत शाळा उपलब्ध आहे.

त्यामुळे सदर भिक्षकरी मुलांसाठी सिग्नल शाळा सुरु करण्याची बाब बृहन्मुंबई महानगरपालिकेच्या विचाराधीन नाही.

(२), (३) व (४) प्रश्न उद्भवत नाही.

---

**मुंबईतील देवनार कचराभूमीमध्ये लागत असलेल्या आगीसंदर्भात उपाययोजना करण्याबाबत**

**(३८) ७६७६४ (२१-०४-२०१७). श्री.तुकाराम काते (अणुशक्ती नगर) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) मुंबईतील देवनार कचराभूमीमध्ये आग लागू नये म्हणून उपाययोजना सुचविण्यासह अन्य काही बाबींवर सल्ला देण्यासाठी महानगरपालिकेने नियुक्त केलेल्या सल्लागाराने मुदत उलटून गेल्यानंतरही आपला अहवाल सादर केला नाही, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, सदरचा अहवाल तीन महिन्यात सादर करण्याचे आदेश दिले होते, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, अहवाल सादर करण्यास विलंब लागण्याची कारणे काय आहेत व याबाबतची सद्यःस्थिती काय आहे ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (२१-०६-२०१७)** :(१) व (२) देवनार क्षेपणभूमीच्या क्षेत्राचा संपूर्ण स्टेशन सर्वे प्राप्त झाल्यानंतर ६० कामांच्या दिवसांत अहवाल सादर करण्याची मुदत आय.आय.टी., मुंबई यांना देण्यात आली होती.

आय.आय.टी., मुंबई यांनी महानगरपालिकेस दिनांक २७.१०.२०१६ रोजी ई-मेलद्वारे मसुदा अहवाल सादर केला असून, दिनांक ०४.०२.२०१७ रोजी अंतिम अहवाल सादर केला आहे.
(३) सदर कामाची व्याप्ती जास्त होती.

आय.आय.टी., मुंबई यांनी त्यांच्या अंतिम अहवालामध्ये काही मुद्दयांचा समावेश करण्याबाबत निरी ही संस्था आय.आय.टी., मुंबई यांना पत्र व्यवहाराद्वारे कळविल असे मा.उच्च न्यायालय, मुंबई यांच्या दिनांक २९.०२.२०१६ रोजीच्या आदेशानुसार स्थापन केलेल्या मॉनिटरींग कमिटीच्या दिनांक १३.०२.२०१७ रोजीच्या सभेतील चर्चेनुसार ठरविण्यात आले.

---

**कल्याण पश्चिमेतील (जि.ठाणे) जुना रेतीबंदर रोड येथील बेकायदा कत्तलखाना व अनधिकृत बांधकाम हटविण्याबाबत**

**(३९) ७६७८९ (२०-०४-२०१७). श्री.किसन कथोरे (मुरबाड), श्री.बळीराम सिरसकर (बाळापूर) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) कल्याण पश्चिमेतील (जि.ठाणे) जुना रेतीबंदर रोड येथील बेकायदा कत्तलखाना व अनाधिकृत बांधकाम हटविण्याचे आदेश मुंबई उच्च न्यायालयाने माहे जानेवारी, २०१७ वा त्या दरम्यानच्या कालावधीमध्ये निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, याबाबत शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीअंती काय निदशर्नास आले तद्नुसार बेकायदेशीरपणे सुरु असलेला कत्तलखाना बंद करून अनधिकृत बांधकामे निष्कासित करण्याचे उच्च न्यायालयाचे आदेश न जुमानणाऱ्या संबंधित अधिकाऱ्यांवर कोणती कारवाई करण्यात आली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (२१-०६-२०१७) :**(१) हे खरे नाही.

प्रस्तुत प्रकरणी मा.उच्च न्यायालयात दाखल झालेल्या जनहित याचिका क्र.१२५/२०१५ च्या अनुषंगाने मा.उच्च न्यायालयाने दि.१४/०९/२०१६ च्या आदेशान्वये तक्रारदाराने महानगरपालिकेकडे निवेदन दिल्यास त्यांची सुनावणी घ्यावी व गुणवत्तेवर निर्णय घ्यावा, असे निर्देश देवून याचिका निकाली काढली आहे.

तत्पूर्वी, कल्याण-डोंबिवली महानगरपालिकेने दि.०४/०३/२०१६ रोजीच्या पत्रान्वये संबंधित बांधकामधारकांस अनधिकृत बांधकाम ७ दिवसांत काढून घेण्याबाबत नोटीस दिल्यामुळे त्या ठिकाणी असलेला बेकायदा कत्तलखाना संबंधितांनी स्वतःहून बंद केला आहे.

मा.उच्च न्यायालयाच्या उक्त आदेशानुसार कल्याण-डोंबिवली महानगरपालिकेने दि.२५/०४/२०१७ रोजी आयोजित केलेल्या सुनावणीस तक्रारदार अनुपस्थित होते.

तथापि, प्रस्तुत प्रकरणी नैसर्गिक न्यायाच्या तत्त्वानुसार तक्रारदार पुन्हा सुनावणी देवून गुणवत्तेवर निर्णय घेण्याची कार्यवाही महानगरपालिकेकडून प्रस्तावित आहे.

(२) व (३) प्रश्न उद्भवत नाही.

---

**कल्याण-डोंबिवली (जि.ठाणे) महानगरपालिकेने सिटी पार्क उभारण्याचा घेतलेला निर्णय**

**(४०) ७६९५८ (२०-०४-२०१७). श्री.सुभाष भोईर (कल्याण ग्रामीण) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) कल्याण-डोंबिवली महानगरपालिकेने (जि.ठाणे) सिटी पार्क उभारण्याचा निर्णय दिनांक २५ डिसेंबर,२०१६ रोजी वा सुमारास घेतला आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर सिटी पार्क कोणत्या ठिकाणी उभारण्यात येणार आहे व त्यामध्ये कोण कोणत्या सोयी सुविधा पुरविल्या जाणार आहेत,

(३) असल्यास, सिटी पार्कच्या कामास सुरवात करण्यात आली आहे काय,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (२२-०६-२०१७) :**(१) हे खरे आहे.

कल्याण-डोंबिवली महानगरपालिकेच्या दि.२०/१२/२०१६ रोजीच्या सर्वसाधारण सभेत सिटी पार्क उभारण्याचा निर्णय घेतला आहे.

(२) कल्याण-डोंबिवली महानगरपालिकेच्या विकास आराखड्यातील आरक्षण क्र.१७४ 'सिटी पार्क' या जागेवर सिटी पार्क उभारण्यात येणार आहे.

सदर सिटी पार्कमध्ये प्रामुख्याने पुढीलप्रमाणे सोयीसुविधा पुरविल्या जाणार आहेत:-

- स्पोर्टस क्लब,
- फुड कोर्ट अॅन्ड क्राफ्ट व्हिलेज,
- इंटरपिटीशन सेंटर (७D थिएटर-१२ सिट्स व क्ल्यूड ऑडिटोरिअम रिसेप्शन),
- एक्झिबिशन सेंटर अॅन्ड फॉर्मल गार्डन,
- लाईट अॅन्ड लेझर शो विथ ऑम्पिथिएटर्स नॅचरल पॉण्ड,
- बॅनक्वेट लॉन अॅन्ड इव्हन बाऊल,
- जॉगर्स ट्रॅक अॅन्ड पाथवेज,
- टॉय ट्रेन,
- थिम रेस्टॉरंट्स,
- चिल्ड्रेन प्ले एरिया,
- वॉटर साईड गार्डन व इतर फॅसिलिटी इत्यादी.

(३) सदर कामास अद्याप सुरुवात करण्यात आलेली नाही.

तथापि, सदर कामाच्या प्राकलनास तांत्रिक, तसेच प्रशासकीय मान्यता देण्यात आली आहे. सदर काम विशेष स्वरुपाचे असल्याने निविदेतील अटी-शर्ती अंतिम करुन निविदा काढण्याची कार्यवाही महानगरपालिकेकडून सुरु आहे.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

## पुण्यातील वाहतूक समस्या सोडविण्याबाबत

**(४१) ७८५५६ (२१-०४-२०१७). श्री.विजय काळे (शिवाजीनगर) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) पुण्यातील वाढती लोकसंख्या विचारात घेता वाहतुकीचा प्रश्न दिवसेंदिवस जटील होत असल्याने त्याबाबत सेन्ट्रल म्युनिसिपल प्लॅन तयार करण्यात आला आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर प्लॅनची अंमलबजावणी करुन पुण्यातील वाहतूक समस्या सोडविण्याच्या दृष्टीने शासनाने कोणती उपाययोजना केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (२०-०६-२०१७)** :(१) वाहतुकीच्या प्रश्नाबाबत पुणे महानगरपालिकेने "सर्वकष वाहतूक आराखडा" (कॉम्प्रेहेन्सीव्ह मोबेलिटी प्लॅन) सी.एम.पी. सन २००८ साली तयार केलेला आहे.

(२) सदर अहवालामध्ये पुणे शहराची ३० वर्षामध्ये होणारी वाढ विचारात घेवून वाहतूक विषयक कामांचा प्राधान्यक्रम (अ) लघुमुदतीची कामे (ब) मध्यम मुदतीची कामे (क) दीर्घ मुदतीची कामे असा निश्चित करणेत आलेला आहे. केंद्र व राज्य शासनाच्या विविध योजनांतर्गत कामांसाठी मिळणारे अनुदान, पुणे महानगरपालिकेच्या अंदाजपत्रकात उपलब्ध होणारी तरतूद तसेच पी.पी.पी. धर्तीवर उपलब्ध होणाऱ्या आर्थिक तरतुदीनुसार सी.एम.पी. अहवालातील कामे करण्यात येत आहेत.

(३) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

### नाशिक येथील उद्यानामध्ये गांडुळ खत प्रकल्प निर्माण करण्याच्या निर्णयाबाबत

**(४२) ७८५७७ (१४-०४-२०१७). श्रीमती दिपिका चव्हाण (बागलाण), श्री.शशिकांत शिंदे (कोरेगाव), श्री.जयंत पाटील (इस्लामपूर), श्री.पांडुरंग बरोरा (शहापूर), श्री.वैभव पिचड (अकोले) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) नाशिक येथील उद्यानामध्ये गांडुळ खत निर्मिती प्रकल्प निर्माण करण्याचा निर्णय शासनाने माहे जानेवारी, २०१७ मध्ये वा त्यादरम्यान घेतला आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, त्यानुसार शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (२२-०६-२०१७)** :(१) होय.

(२) नाशिक महानगरपालिकेच्या सहाही विभागातील महत्वाच्या उद्यानात महानगरपालिकेमार्फत गांडुळ खत प्रकल्प प्रायोगिक तत्वावर राबविण्यात येत आहे.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

---

### परभणी शहरात एलबीटी वसुलीसाठी नेमलेली एजन्सी रदद करण्याबाबत

**(४३) ७९२८० (२१-०४-२०१७). डॉ.राहूल पाटील (परभणी) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) परभणी शहरात एलबीटी वसुलीसाठी नेमलेली एजन्सी रदद करावी या प्रमुख मागणीसाठी दिनांक २६ जानेवारीपासून व्यापा-यांनी बेमुदत बंद पुकारल्याचे नुकतेच माहे जानेवारी, २०१७ मध्ये वा त्या सुमारास निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, एलबीटी एजन्सीच्या विरोधात परभणीतील व्यापा-यांनी सुरु केलेल्या आंदोलनामुळे पाच दिवसांत सुमारे २०० कोटी रुपयांचा व्यवहार ठप्प झाला आहे, हेही खरे आहे काय,

(३) असल्यास, सदर प्रकरणी शासनाने कोणता निर्णय घेतला वा घेण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (२३-०६-२०१७)** :(१) होय, हे खरे आहे.
(२) परभणी शहरातील व्यापाऱ्यांनी आपली आस्थापना दिनांक २६ जानेवारी २०१७ पासून बंद ठेवण्यात आली होती व शहरातील बहूतांश व्यवहार बंद होते.
(३) आयुक्त, परभणी महानगरपालिका यांनी नेमलेल्या एजन्सीने केलेल्या स्थानिक संस्था कराच्या निर्धारणानुसार करावयाच्या वसुलीस पुढील आदेशार्पंत स्थगिती देण्याबाबत त्यांना कळविण्यात आले असून शासनामार्फत लवकरच निर्णय घेण्यात येत आहे.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

**नाशिक शहरातील जुना नाशिक परिसरात पाईपलाईन मधून रक्तमिश्रित पाणी पुरवठा होत असल्याबाबत**

**(४४) ७९२९७ (२१-०४-२०१७). श्रीमती देवयानी फरांदे (नाशिक मध्य), श्रीमती सीमाताई हिरे (नाशिक पश्चिम) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) नाशिक शहरातील जुना नाशिक परिसरात दिनांक २३ डिसेंबर, २०१६ रोजी महापालिकेच्या पाईपलाईन मधून रक्तमिश्रित पाणी पुरवठा होत असल्याच्या तक्रारी प्राप्त झाल्या, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, या पुर्वीही दोन ते तीन वेळेस रक्त मिश्रित पाणी पुरवठा या परिसरात झाला असून दुषित पाण्यामुळेच काविळीने एका तरुणीचा मृत्यू झाला, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, शासनाने दुषित, रक्त मिश्रित पाणी पुरवठ्याबाबत काय उपाययोजना केली तसेच संबंधित महानगरपालिकेच्या अधिकाऱ्यांवर काय कारवाई केली वा करणार आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (१९-०६-२०१७)** :(१) होय.
(२) महानगरपालिकेच्या पाण्याच्या पाईपलाईन वरुन काही नागरिकांचे नळ कनेक्शनची सर्व्हीस पाईपलाईन गटारीच्या चेंबरमधून गेलेले आढळले. सदर पाईपलाईनचे जी.आय. पाईप खराब झाल्याने त्यातुन ड्रेनेजचे पाणी व अन्य घटक मिश्रित लाल रंगाचे पाण्याचा पाईपलाईनमध्ये शिरकाव झाला व त्यामुळे त्यावरील कनेक्शन धारकांना माहे डिसेंबर २०१६ मध्ये दोन वेळेस दुषित पाणी आल्याचे निदर्शनास आले.

मात्र दुषित पाण्यामुळे माहे डिसेंबर २०१६ ते फेब्रुवारी २०१७ पर्यंत काविळीच्या आजाराने मृत्युची नोंद महानगरपालिकेत झालेली नाही.
(३) व (४) दुषित पाण्याची तक्रार प्राप्त होताच गटारीतून गेलेले नागरिकांचे सर्व्हीस कनेक्शन त्वरीत बंद करुन दुषित पाणीपुरवठा बंद करण्यात आला. सद्यस्थितीत त्या ठिकाणी स्वच्छ पाणीपुरवठा करण्यात येत आहे. सदर प्रकरणी तातडीने उपाययोजना करण्यात आल्याने संबंधित अधिकाऱ्यांवर कारवाई करण्याचा प्रश्न उद्भवत नाही.

---

**मुंबई महानगरपालिका शौचविधी झाल्याचे पालिका प्रशासनाने जाहीर केले असल्याबाबत**

**(४५) ७९४१४ (२१-०४-२०१७). श्री.नसीम खान (चांदिवली), श्री.पृथ्वीराज चव्हाण (कराड दक्षिण) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मुंबई महानगरपालिका हागवणदारीमुक्त झाल्याचे पालिका प्रशासनाने जाहीर केले आहे तसे पत्रच मुंबई महानगरपालिका आयुक्तांनी राज्याच्या नगरविकास खाते व शहरी भागाचे (स्वच्छ भारत) अभियानाचे राज्याच्या संचालकांना लिहून कळविले असल्याचे माहे डिसेंबर, २०१६ रोजी वा त्या सुमारास निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, स्वच्छ भारत अभियांनातील निकषानुसार हागवणदारी होणा-या भागात ५०० मीटर परिसरात सर्वत्र शौचालये उपलब्ध करुन देणे बंधनकारक होते परंतू मुंबईमधील पालिकेच्या २४ विभाग कार्यालयाच्या हद्दीमध्ये ११८ ठिकाणी उघडयावरच प्रात:विधी करण्यात येत असून याठिकाणी शौचालयाची व्यवस्था नाही, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, महानगरपालिका प्रशासन करीत असलेला दावा व खरी स्थिती यामध्ये तफावत असल्याने स्वच्छ भारत अभियांनाची चौकशी करुन कारवाई करण्यात येणार आहे काय,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (२२-०६-२०१७) :**(१) हे खरे आहे.

(२), (३) व (४) • स्वच्छ भारत अभियानाच्या मार्गदर्शक सूचनांनुसार मुंबई शहरातील सर्व २४ विभागांत ५०० मीटर परिसरात सर्वत्र सामुदायिक शौचालये उपलब्ध करुन देण्यात आलेली आहेत.

• मुंबई शहर उघडयावर शौचविधीमुक्त करण्यासाठी तयार करण्यात आलेल्या ११८ जागांच्या यादीपैकी काही जागांजवळ सामुदायिक शौचालयाची व्यवस्था करण्यात आली असून, उर्वरित जागांजवळ प्राधान्याने अधिकची सामुदायिक शौचालयाची व्यवस्था करण्यात येत आहे, तोपर्यंत अशा ठिकाणी तात्पुरत्या स्वरुपात शौचालयाची व्यवस्था महानगरपालिकेमार्फत करण्यात आली आहे.

• स्वच्छ भारत अभियानांतर्गत मुंबई शहरामध्ये १३२७ वैयक्तिक घरगुती शौचालये, १९५१ सामुदायिक शौचकुपे तसेच ७९० सार्वजनिक शौचकुपे असे एकूण ४०६८ शौचकुपांचे बांधकाम पूर्ण झाले असल्याचे मुंबई महानगरपालिकेने कळविले आहे.

• बृहन्मुंबई महानगरपालिकेच्या जुन्या वापरात नसलेल्या किंवा कमी वापरात असलेल्या सामुदायिक शौचालयांमधील १२७३ शौचालयांमध्ये वीज पुरवठा आणि १११८ शौचालयांमध्ये पाणी पुरवठा इ. सुविधा उपलब्ध करुन देण्यात आल्या असून, त्यामुळे नागरिकांकडून सदर शौचालयांचा नियमित वापर सुरु झाला आहे.

• शहरी विकास मंत्रालय, भारत सरकार यांच्या मार्गदर्शक तत्वानुसार, ५०० मीटरच्या अंतरामध्ये सामुदायिक शौचालयाची व्यवस्था करणे, उघडयावरील शौचविधीस प्रतिबंध करण्यासाठी क्लीन-अप मार्शलची व्यवस्था करणे इ. बाबींची पूर्तता करुन बृहन्मुंबई महानगरपालिकेने दिनांक २९.१२.२०१६ रोजी मुंबई शहर उघडयावर शौचविधीमुक्त घोषित केले आहे.

---

**कल्याण-डोंबिवली (जि.ठाणे) महापालिकेच्या शिक्षण मंडळाने शालेय साहित्य खरेदीत गैरव्यवहार केल्याबाबत**

**(४६) ८०३८१ (२१-०४-२०१७). श्री.शांताराम मोरे (भिवंडी ग्रामीण), श्री.किसन कथोरे (मुरबाड), श्री.बळीराम सिरसकर (बाळापूर) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) कल्याण-डोंबिवली (जि.ठाणे) महापालिकेतील शिक्षण मंडळाने सन २०१६ मध्ये केलेल्या शालेय साहित्य खरेदीत ६० लाख रुपयांचा गैरव्यवहार केल्याचे माहे डिसेंबर, २०१६ वा त्या दरम्यानच्या कालावधीमध्ये निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, याबाबत शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीनुसार शालेय साहित्य खरेदी मध्ये गैरव्यवहार करणाऱ्या ठेकेदार व सभापती यांच्यावर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (२२-०६-२०१७) :**(१) हे खरे नाही.

सन २०१५-१६ व सन २०१६-१७ या दोन वर्षाकरीता कल्याण-डोंबिवली महानगरपालिकेने शालेय साहित्य खरेदीकरीता ई-टेंडरिंगद्वारे ऑनलाईन पद्धतीने निविदा मागविल्या होत्या. प्राप्त निविदांपैकी न्यूनतम निविदाधारक यांच्याशी झालेल्या वाटाघाटीअंती निश्चित केलेल्या दरास कल्याण-डोंबिवली महानगरपालिका शिक्षण मंडळाच्या दि.०६/०७/२०१५ च्या सर्वसाधारण सभेने मंजूरी दिली आहे.

कल्याण-डोंबिवली महानगरपालिकेच्या सर्वसाधारण सभेने व शिक्षण मंडळाने उक्त ठरावाद्वारे दिलेल्या मंजूरीनुसारच सन २०१६-१७ या शैक्षणिक वर्षाकरीता शालेय साहित्य खरेदी केली आहे.

(२) व (३) प्रश्न उद्भवत नाही.

---

**गोरेगाव (जि.मुंबई) सिद्धार्थनगर येथील पालिका शाळेतील शिक्षकांची पदे भरण्याबाबत व वर्गखोल्या उपलब्ध करून देण्याबाबत**

**(४७) ८०४५३ (२१-०४-२०१७). श्री.संतोष दानवे (भोकरदन) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) गोरेगाव (मुंबई) सिद्धार्थनगर येथील पालिका शाळेत शैक्षणिक वर्ष संपत आले तरी तब्बल ११ शिक्षक कमी असल्याचे माहे जानेवारी, २०१७ मध्ये निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) तसेच या शाळेतील तळमजला खाजगी शिक्षण संस्थेला भाडेतत्वावर दिल्याने पालिका शाळेतील विद्यार्थ्यांना ११ वर्गखोल्याही कमी पडत आहेत, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उक्त प्रकरणी चौकशी करण्यात आली आहे काय,चौकशीनुसार सदरहू शाळेतील शिक्षकांची पदे भरण्याबाबत व वर्गखोल्या उपलब्ध करून देण्याबाबत शासन काय कार्यवाही करीत आहे वा करणार आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (२१-०६-२०१७) :**(१) व (२) हे खरे आहे.
(३) व (४) सदर प्रकरणी समायोजनाद्वारे माध्यमिक विभागाकडून २ शिक्षक व अनुदानित विभागाकडून ५ तसेच, महानगरपालिकेच्या पी/दक्षिण विभागातील २ असे एकूण ९ शिक्षक उपलब्ध झाले आहेत.

तसेच, पुढील शैक्षणिक वर्षाकरिता उर्वरित ३ शिक्षकांची पदे महानगरपालिकेमार्फत भरण्यात येणार आहेत.

मन्नास वैभव या संस्थेस शैक्षणिक उपक्रमाकरिता अनुज्ञा व अनुज्ञापन तत्वावर वार्षिक भाडेतत्वावर देण्यात आलेल्या एकूण ११ वर्गखोल्यांपैकी २ वर्गखोल्या यापूर्वी रिक्त करण्यात आल्या आहेत.

उर्वरित वर्गखोल्या टप्प्याटप्प्याने रिक्त करुन घेण्याची कार्यवाही महानगरपालिकेमार्फत प्रस्ताविण्यात येणार आहे.

---

## नांदेड शहराच्या विविध भागातून १८ नाल्यांद्वारे येणारे दूषित पाणी गोदावरील नदीपात्रात सोडले जात असल्याबाबत

**(४८) ८०७२८ (२०-०४-२०१७). श्री.प्रतापराव पाटील चिखलीकर (लोहा) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) नांदेड शहराच्या विविध भागातून १८ नाल्यांद्वारे येणारे दूषित पाणी गोदावरी नदीपात्रात सोडले जात असल्याचे माहे जानेवारी, २०१७ च्या सुमारास निदर्शनास आले, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, याबाबत स्थानिक नागरिकांनी महापालिकेकडे वारंवार तक्रार करुनही कोणतीच कारवाई केली नाही, हेही खरे आहे काय,
(३) असल्यास, याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (२२-०६-२०१७) :**(१) अंशतः खरे आहे.

१९ नाल्यांचे पाणी नदीत सोडलेले नसून, या १९ नाल्यांचे सांडपाणी अस्तित्वातील पाईपलाईन मध्ये घेऊन ते बोंढार मलशुध्दीकरण केंद्रास जोडण्यात आलेले आहे,तथापी मलवाहीनीमध्ये गाळ साचून राहिल्यामुळे या मलवाहिनीतून व नाल्याद्वारे गळती होत आहे.

(२) व (३) सदर मलवाहिनी प्रवाहीत करण्यासाठी आवश्यक त्या बाबींसह रु.५६ लक्ष किंमतीचे दुरूस्तीचे काम महानगरपालिकेमार्फत हाती घेण्यात आलेले आहेत.सदर काम पूर्ण झाल्यानंतर नदीत जाणारे नाल्याचे पाणी पाईप लाईनद्वारे बोंढार मलशुध्दीकरण केंद्रात जाउन जल प्रदुषण बंद होईल.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

**कल्याण-डोंबिवली (जि.ठाणे) महानगरपालिकेच्या ग्रामीण 'अ' प्रभाग क्षेत्राला जोडणाऱ्या उल्हासनदीजवळील वडवली रेल्वे फाटकाजवळील वडवली उड्डाणपूलाबाबत**

**(४९) ८१४३० (२१-०४-२०१७). श्री.धैर्यशील पाटील (पेण) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) कल्याण-डोंबिवली (जि.ठाणे) महानगरपालिकेच्या ग्रामीण 'अ' प्रभाग क्षेत्राला जोडणाऱ्या उल्हासनदीजवळील वडवली रेल्वे फाटकाजवळील वडवली उड्डाणपूलाच्या कामास सन २०१० मध्ये मंजूर होवून पूलाच्या कामाचे भूमिपूजन झाले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, रेल्वेने त्यांच्या अखत्यारीतील पूलाचे काम पूर्ण केले तरीही कल्याण - डोंबिवली महानगरपालिका प्रशासनाकडून सदरहू पूलाचे काम कासव गतीने सुरू असल्याने मागील ६ वर्षांपासून काम प्रलंबित आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, कल्याण-डोंबिवली महानगरपालिकेकडून सदरहू उड्डाणपूलाच्या कामास विलंब होण्याची कारणे काय आहेत,
(४) असल्यास, सदरहू पूलाचे काम शिघ्रगतीने हाती घेऊन लवकरात लवकर पूर्ण होण्याच्यादृष्टीने शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (२०-०६-२०१७) :**(१) व (२) हे खरे आहे.
(३) सदर उड्डाणपूलाचे पोहोच रस्ते विकास योजनेतील प्रस्तावित रस्त्यांवर नियोजित असून सदर जागा हस्तांतरणीय विकास हक्कांच्या माध्यमातून महानगरपालिकेच्या ताब्यात घेण्याच्या प्रक्रियेतील विलंबामुळे पोहोच रस्त्याच्या कामास विलंब झाला. सद्यस्थितीत जमिन मालकांच्या संमतीने पोहोच रस्त्याचे काम प्रगतीपथावर आहे.
(४) व (५) सदर प्रकल्पातील काही जागा जमिन मालकाच्या सहमतीने संपादित करण्यात आल्या असून उर्वरित जमिनीच्या भूसंपादनासंदर्भातील अडचणी दूर करुन उड्डाणपूलाचे काम लवकरात लवकर पूर्ण करण्याचे महानगरपालिकेचे नियोजन आहे.

---

**अहमदनगर महानगरपालिकेला एलबीटी मधून मिळणारे अनुदान मागील तीन महिने महानगरपालिकेला मिळाले नसल्याबाबत**

**(५०) ८३१२० (२०-०४-२०१७). श्री.संग्राम जगताप (अहमदनगर शहर) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) अहमदनगर महानगरपालिकेला एलबीटी मधून मिळणारे अनुदान मागील तीन महिने महानगरपालिकेला मिळाले नाही, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, यामुळे कर्मचाऱ्यांना उपासमारीला सामोरे जावे लागते व महानगरपालिका कर्मचारी आर्थिक संकटात सापडले आहेत, हे खरे आहे काय,
(३) असल्यास, याबाबत जबाबदार अधिकाऱ्यांवर कोणती कार्यवाही करण्यात येणार वा येत आहे काय,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (२३-०६-२०१७) :**(१) हे खरे नाही.

अहमदनगर महानगरपालिकेस माहे जानेवारी २०१७ चे रु.५.१८ इतके अनुदान व माहे फेब्रवारी व मार्च चे रु.११.५७ कोटी अनुदान वितरीत करण्यात आले आहे.
(२) हे खरे नाही.
(३) व (४) प्रश्न उद्भवत नाही.

---

**विधान भवन :**
**मुंबई.**

**डॉ. अनंत कळसे**
**प्रधान सचिव,**
**महाराष्ट्र विधानसभा.**

---

शासकीय मध्यवर्ती मुद्रणालय, मुंबई.